

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय)**

तंत्रज्ञान विकसित झाले. वर्ल्डबुक इन्सायक्लोपिडीया, ब्रिटानिका, विकीपीडिया आदी सर्व संदर्भ ग्रंथांमध्ये संकेत स्थलांवर विज्ञानाचा मानवी जीवनावर खोल परिणाम झालेला असून जीवन सुखी करण्यासाठी लागणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाला या ज्ञानाने आधार पुरवला आहे अशा स्वरूपाची माहिती आहे.

वैज्ञानिक हे या शाखांमधील तथ्ये एकत्रित करण्यासाठी त्यांचे निरीक्षण करण्यासाठी पद्धतशीर अभ्यास करतात. त्यामुळे त्यांतून विकसित झालेल्या अनेक ज्ञानशाखांचा इतिहास हा एक स्वतंत्र व सखोल विषय विकसित झाला आहे. अशा एका ग्रंथांत डॅंपिअरने याचा तपशीलवार अभ्यास केला आहे. १५–१६ व्या शतकात झालेल्या वैज्ञानिक क्रांतीने या ज्ञानशाखांच्या आंतरशाखीय अभ्यासास वेग प्राप्त झाला. युरोपमध्ये १५४३ साली खगोल शास्त्रातील दोन ग्रंथ प्रकाशित झाले. त्यांनी या अभ्यासाला वेगळा दृष्टिकोन प्राप्त करुन दिला. पोर्तुगीज खगोलशास्त्रज्ञ निकोलस केपर्निकस व आताच्या बेल्जियम मधील अँड्रीज व्हेसॅलियस हे ते खगोलशास्त्रज्ञ होय.

पृथ्वी हा विश्वाचा मध्य असून सूर्यमाला तिच्याभोवती फिरते आणि सूर्य हा मध्य असून इतर ग्रह त्याच्याभोवती फिरतात, यांवरील अभ्यासकांच्या अभ्यासाचा इतिहासही अतिशय रंजक व विज्ञान इतिहासावर प्रकाश टाकणारा आहे. यामध्ये धर्ममार्तंडांच्या व चर्चच्या विचारांचा प्रभाव आणि त्यांतून प्राश्चात्त्य देशांत झालेले विचारमंथन हा भागही महत्त्वाचा आहे. या सर्वांमुळे विज्ञानातील प्रयोग पद्धतीचा विकास होत गेला.

या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर भारतात पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या विचारांतून निर्माण झालेल्या वैज्ञानिक संस्थांच्या इतिहासाचा शास्त्रशुद्ध अभ्यास आपल्याकडे होणे ही गरज आहे. एकविसावे शतक उजाडेल आणि काहीतरी क्रांती होईल अशा भाबड्या आशेवर असणाऱ्या अनेकांचा चुकीचे सामाजिक संकेत, अंधश्रद्धा यांमुळे भ्रमनिरास होत आहे. आजही बुवाबाजी, भ्रष्टाचाराच्या मार्गाने चाललेल्या रूढी व परंपरा (त्यांच्या प्रसारासाठी व प्रचारासाठी वापरले जाणारे विज्ञान हा तर वेगळाच विषय आहे!) धर्माच्या व विज्ञानाच्या चुकीच्या जाणिवा अस्तित्वात आहेत. एकविसावे शतक, बाविसावे शतक व अशा शतकांतील विज्ञानाच्या प्रगतीला असणाऱ्या मर्यादा लक्षात घेऊनही दुर्दैवाने सामान्य माणसाचा विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला जात नाही. त्यासाठी अनेक तत्त्वचिंतकांच्या विचारांचे अभ्यासपूर्ण अवगाहन करणे आवश्यक आहे.

**– मोहन पाठक**

## वेळ नाही ?

अमाप सुख आहे सगळ्यांच्याच पदरात
पण ते अनुभवायला वेळ नाही

आईच्या अंगाईची जाणीव आहे
पण आईला आज आई म्हणायला वेळ नाही

सगळ्यांची नावं मोबाईलमध्ये सेव आहेत
पण प्रेमाचे चार शब्द बोलायलाही वेळ नाही

डोळ्यांवर आलेय खूप झोप
पण आज कोणाकडे झोपायलाही वेळ नाही

सांगेल कोण कशाला दुसऱ्याबद्दल
जेंव्हा इथे स्वत:कडेच बघायला वेळ नाही

परक्याची जाणीव कशी असेल
जर इथे आपल्याच माणसांसाठी वेळ नाही

अरे जीवना तूच सांग
जगण्यासाठी चालेल्या या धावपळीत
जगायलाच आज वेळ का नाही????

●●●

वर्ष चौदावे/अंक २/फेब्रुवारी २०१३

वर्ष चौदावे/अंक २/फेब्रुवारी २०१३

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १७ वे/अंक ८ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | डॉ. मो. दि. पराडकर - आदरांजली | डॉ. विजय बेडेकर | ३ |
| ३) | सन यात सेनच्या जन्मगावाला भेट | डॉ. सुधाकर आगरकर | ५ |
| ४) | श्रीमत् भगवद्गीता - अध्याय पहिला अर्जुन विषाद योग | श्री. शं. बा. मठ | ८ |
| ५) | स्वातंत्र्यवीर श्री. विनायक दामोदर तथा तात्याराव सावरकर | श्री. मा. ना. पाटील | १४ |
| ६) | पुस्तक परिचय | श्रीमती आशा भिडे | १६ |
| ७) | रियासतकर गोविंद रखाराम सरदेसाई यांच्या रिसायती हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास | श्री. शरद जोशी | २० |
| ८) | मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर | असीम | २४ |
| ९) | 'दिशा' सूची २०१२ | श्री. सचिन गराटे | २६ |
| १०) | पूर्व प्राथमिक - ए. के. जोशीचे वार्षिक स्नेहसंमेलन २०१२ | सौ. प्रिती कुलकर्णी | ३१ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- ❖ दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- ❖ आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
  कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
  या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- ❖ www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

– संपादक

# डॉ. मो. दि. पराडकर - आदरांजली

डॉ. मो. दि. पराडकर यांचे १३ डिसेंबर २०१२ च्या पहाटे निधन झाले. डॉ. पराडकर आज आपल्यात नाहीत ही कल्पनाच बेचैन करणारी होती. त्यांचे व माझे वैयक्तिक व त्यामुळे ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे संबंध निकटचे होते. १९८२ साली प्राच्य विद्या अभ्यास संस्थेच्या वार्षिक परिषदा चालू झाल्या. पहिल्या परिषदेपासून पुढील १०-१२ वर्षे त्यांचे सूत्रसंचालन श्री. वेलणकर करायचे. संस्कृत साहित्य आणि भारतीय संस्कृतीवरील त्यांचे वाचन आणि अभ्यास यामुळे त्यांचे सुरुवातीचे व समारोपाचे भाषण ही मेजवानीच असायची. वय आणि प्राकृतिक अस्वास्थामुळे या परिषदांना येणे त्यांना कठीण होऊन बसले आणि साहजिकच ही नैसर्गिक जबाबदारी डॉ. मो. दि. पराडकर यांच्यावर पडली. पुढच्या परिषदांचे मार्गदर्शन, सूत्रसंचालन डॉ. पराकडरांनी त्याच ताकदीने चालू ठेवले. डॉ. मो. दि. पराडकरांचा संस्कृत साहित्याचा व भारतीय संस्कृतीचा अभ्यास व जाण यांमुळे त्यांची बीजभाषणे लोकांना एक आनंद देत होती. संस्कृत, इंग्रजी, हिंदी व मराठी या भाषांवरील त्यांचे प्रभुत्व विस्मयकारक होते. संशोधनपर लेखनाबरोबरच त्यांनी अभ्यासेतर नियतकालिकांतूनही विपुल लेखन केले. त्यांच्या विद्यार्थ्यांची व चाहत्यांची त्यांचे लख संकलित स्वरूपात पुस्तक रूपाने मिळावेत ही कल्पना त्यांच्यासमोर मांडताच त्यांनी मान्यता तर दिलीच; पण स्वतःकडे उपलब्ध असलेल्या लेखांच्या सर्व प्रती उपलब्ध करुन दिल्या. डॉ. मो. दि. पराडकर गौरव ग्रंथ काढण्याचे ठरले आणि बऱ्याच संस्कृत, मराठी, हिंदी अभ्यासकांना पत्रे लिहिण्यात आली. सर्वांना ही कल्पना आवडली; एवढेच नव्हे तर त्या सर्वांनी मो. दिं. च्या स्नेहामुळे लगेचच साहित्य पाठवले. त्यामुळे एक संग्राह्य व संदर्भमूल्य असणारा ग्रंथ तयार झाला. डॉ. मो. दि. पराडकर कविवर्य मोरोपंतांच्या वंशातील होते. त्यांनी संस्कृतबरोबर मराठी आणि हिंदी प्रचार, प्रसाराचे जे कार्य केले ते प्रचंड होते.



कै. डॉ. मो. दि. पराडकर

वि. प्र. मंडळाच्यावतीने 'दिशा' हे मासिक प्रकाशित करायचे ठरल्यावर डॉ. मो. दि. पराडकरांनी त्यात लेखन करावे अशी विनंती मी केली. त्यांनीच कल्पना दिली की, प्रत्येक अंकात आपण एक सुभाषित देऊ. दिशाच्या सुरुवातीच्या काही वर्षांच्या अंकात आलेले त्यांचे हे लखन महत्त्वाचे योगदान आहे. दिशातून त्यांनी अपल्या जीवनचरित्रावर लिहिलेले लेख नवीन पिढीला मार्गदर्शक ठरणारे आहेत.

डॉ. मो. दि. पराडकर ठाण्याला आमच्या 'नारायण भुवन' या इमारतीत रहायचे. शाळेतून आल्यावर क्रिकेटचे धावते समालोचन ऐकण्याकरता घरी जाण्याआधी मी त्यांच्याकडे जात असे. साहजिकच इंग्रतीतील ते समालोचन फारसे कळत नव्हते. पण डॉ. पराडकर स्वतः इतके क्रि केटप्रेमी होते की त्या वर्णनाचे खुबीदार वर्णन ते मला तेवढ्याच खुबीदारपणे सांगायचे. त्यांच्याबरोबर ऐकलेली ही धावती समालोचने माझ्या आठवणींचा मोठा साठा आहेत. त्याचबरोबर मी काय वाचतो, काय वाचायला हवे यावर चर्चा करत ते माझ्या वाचनाचाही पाठपुरावा करीत. सगळे जग बघण्याची उर्मी निर्माण करून त्या दृष्टीने मला उद्युक्त करणारेही

डॉ. पराडकर होते. त्यासाठी माझ्याकडून प्रवासवर्णने त्यांनी वाचून घेतली.

डॉ. पराडकर हे संस्कृतीचा चालता बोलता कोश होते. या विषयातील कोणाती संदर्भ हवा असेल तर तो हक्काने विचारावा असे ते व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या जाण्याने प्राच्य विद्या संस्था या आमच्या संस्थेचे नुकसान तर झाले आहेच, पण माझे मार्गदर्शक, तत्त्वज्ञ व मित्र असणारे सल्लागार गेले. यामुळे माझेही अपरिमित नुकसान झाले आहे.

डॉ. पराडकरांना मनःपूर्वक आदरांजली !

**– डॉ. विजय वासुदेव बेडेकर**

माननीय संपादक, दिशा

●●●

## डॉ. मो. दि. पराडकर यांची माहिती

**संपूर्ण नाव** : डॉ. मोरेश्वर दिनकर पराडकर

**जन्म** : १७ नोव्हेंबर १९२५, परभणी. कविवर्य मोरोपंतांची सातवी पिढी

**शिक्षण** : एम.ए. (१९४७) पी. एच्.डी.(१९५४), साहित्य रत्न (१९५१)

**अनुभव**

मुंबईतील अनेक महाविद्यालयांत व मुंबई विद्यापीठ संस्कृत विभागात संस्कृत अध्यापन.

(अर्धमागधी) १९४७-६६, सोनोपंत दांडेकर कॉलेज पालघर, प्राचार्य (१९७०-८५)

पेंढरकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, प्राचार्य (१९७०-८५)

बम्बई हिन्दी विद्यापीठ माहीम-मानद अधिकारी १९५७-७०, कुलपति १९७० नंतर

**प्रमुख रचना-इंग्रजी**

Similies in Manusmriti, Malavikagnimitram A Critical Study, Ed. Studies in the Geeta

**मराठी**

शाकुन्तल (कथा), मालविकाग्निमित्र (कथा)(१९७८), भारतातील प्राचीन विद्यापीठे - दुसरी आवृत्ती (१९९०)

संपादित - आर्याभारत ६ खण्ड, हरिवंश वगैरे (१९६४), चतुराख्यान (१९८०), वाडेश्वर माहात्म्य (१९८१)

**हिन्दी अनुवादित ग्रंथ**

वैदिक संस्कृतिका विकास (१९५७) रवीन्द्रनाथ जीवनगाथा (१९६५) ऋक्सूक्त वैजयंती (१९६७), विवेकानन्दांची पत्रे (१९७०)

**सम्पादित**

रजय जयंती ग्रंथ (१९६३), हिन्दी भाषा साहित्य और संस्कृती (१९८८)

**विदेश प्रवास**

जागतिक संस्कृत परिषद - फिलाडेल्फिया १९८४, जागतिक संस्कृत परिषद - नैदर्लैण्ड १९८७

**निधन** : १३ डिसेंबर २०१२, मुंबई

औषधाबरोबर श्रद्धा व प्रार्थनाही हवी.

# सन यात सेनच्या जन्मगावाला भेट

*सन यात सेनच्या झोगशान या गावाचे हे वर्णन – संपादक*

चीनच्या गाँग्च्यू (Guangzhou) शहरात भरलेल्या विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी आम्ही ठाण्यातील विद्यार्थ्यांचा चमू घेऊन ऑगस्ट २०१० मध्ये चीनला गेलो होतो. विज्ञान प्रदर्शनाच्या दुसऱ्या दिवशी प्रदर्शनाचे परीक्षण व्हायचे होते. त्या परीक्षणाच्या वेळी प्रकल्प निर्माण करणाऱ्या विद्यार्थ्यांनीच प्रदर्शन स्थळी राहावे त्यांच्याबरोबर आलेल्या मोठ्या व्यक्तींनी दिवसभर तिकडे फिरकू देखील नये अशी आयोजकांची योजना असते. म्हणून त्या दिवशी आंतरराष्ट्रीय गटातील सर्व वयस्कर मंडळीना सहलीला न्यायचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे १२ देशांतील आम्ही सुमारे २५ जण एका बसने झोगशान (Zgshan) या गावी गेलो.



**वाटेवरील दृश्य**

गाँग्च्यू ते झोगशान जवळपास १५० किलामीटर एवढे अंतर असेल. या प्रवासाला आम्हांला तीन तासाहून कमी वेळ लागला. गाँग्च्यू वरून मकाऊ बेटाच्या दिशेने जावे लागते. संपूर्ण रस्ता ८ लेनचा असून वाटेत किती उड्डाणपूल असावेत याची मोजदाद नाही. गाँग्च्यूच्या आजूबाजूला नद्यांचे जाळेच आहे. त्यामुळे अनेक पूल पार करावे लागतात. रस्त्याच्या मधोमध आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुंदर झाडे लावलेली आहेत. त्यामुळे संपूर्ण प्रवासात आपण जणू बागेतच आहोत असे वाटते. संपूर्ण रस्ता गुळगुळीत असून कोठेही खड्डा शोधूनदेखील सापडत नाही. त्यामुळे प्रवास सुखाचा झाला. तीन तास गाडी चालवून झाल्यावरदेखील कोणत्याही प्रकारचा थकवा चालकाच्या चेहऱ्यावर जाणवला नाही.



**झोगशान गावाचे प्रवेशद्वार**

झोगशान या गावाला चीनच्या दृष्टीने खूपच महत्व आहे. याच गावात सन यात सेन या महान व्यक्तीचा जन्म झाला होता. या गावातील शेतकऱ्याच्या कुटुंबात जन्मलेला हा मुलगा पुढे चीनचा सर्वेसर्वा झाला. त्याच्या बालपणात त्याने चिनी जनतेच्या हालअपेष्टा जवळून पाहिल्या होत्या. त्यावेळेस चीनमध्ये लहानलहान राज्ये होती. प्रत्येक राजाची राज्यकारभाराची पद्धत वेगळी. त्यातल्यात्यात बरेच राजे विलासी होते. जनतेच्या सुखाकडे फारसे लक्ष न देता आपण सुखसमाधानात राहणे यातच ते धन्यता मानत असत. ही

राजवट मोडून काढण्याचा विडा सन यात सेनने उचलला. चीनमधील शिक्षण झाल्यावर उच्च शिक्षणासाठी तो हवाई बेटावर गेला. तेथून परत आल्यावर त्याने शेतकरी आणि कामगारांना एकत्र करण्याचे काम सुरू केले. या दोन प्रबळ शक्तीना एकत्र आणून त्याने राज्यांविरूद्ध बंड पुकारले, मोर्चे आयोजित केले, गरज पडली तेव्हा हत्यारदेखील वापरले. या सर्व प्रयत्नांना यश येऊन राजेशाहीचा बिमोड झाला आणि समाजवादी चीनची निर्मिती झाली. नवीन समाजवादी चीनचा निर्माता, म्हणून सन यातसेनला खूप मान आहे.




**स्मारकाचे प्रवेशद्वार**

ज्या गावी सन यात सेनचा जन्म झाला ते गाव फार लहान आहे. आता ते पर्यटनस्थळ म्हणून जास्त प्रसिद्ध आहे. मोठ्या संख्येने देशी आणि विदेशी पर्यटक येथे येतात. उत्तम प्रवेशद्वाराने या पर्यटन स्थळाची सुरुवात होते. आत उंच झाडे वाढवून संपूर्ण परिसर हिरवेगार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्या घरी सन यात सेन जन्माला आला ते घर आणि आजूबाजूची काही घरे अजून जशीच्या तशीच ठेवलेली आहेत. हवाई बेटावरून परत येताना त्याने एक रोपटे आणले आणि आपल्या घराच्या अंगणात लावले. त्या रोपट्याचा आता वृक्ष झाला आहे. वादळामध्ये ते झाड चांगलेच वाकले. तरीही ते अजून सांभाळून ठेवण्यात आलेले आहे. २० व्या शतकाच्या सुरुवातीला घरे कशी होती. त्यावेळेस घरात काय सुविधा होत्या याची कल्पना आपल्याला हे ठिकाण पाहून येते.



**स्मारका सभोवतीची वनराई**

या पर्यटन स्थळात जागोजागी आपल्याला प्रदर्शन पाहायला मिळते. आता काही लोकांनी लहानलहान दुकाने देखील तेथे थाटलेली आहेत. येणारे पर्यटक तेथे खरेदी करताना आढळतात. या वस्तूंमध्ये कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तूंपेक्षा गावातील कलाकारांनी तयार केलेल्या वस्तूंचाच भरणा अधिक असतो. जुनी घरे, जुन्या किंवा ग्रामीण वस्तू असाच या परिसराचा साज आहे.



**घरातील जुन्या वस्तू**

जुन्या घरांचे रूप पाहून आपण जेव्हा बाहेर पडतो तेव्हा एक प्रशस्त इमारत आपल्या नजरेस पडते. हे सन

यातसेनच्या जीवनाची माहिती देणारे संग्रहालय आहे. त्याच्या बालपणापासून तर त्याच्या अध्यक्षीय राजवटी पर्यंत सर्व माहिती येथे चित्ररूपाने दाखविलेली आहे. प्रत्येक ठिकाणी इंग्रजी आणि चीनी भाषेत माहिती दिलेली आहे. त्यामुळे पर्यटकांना अडचण येत नाही. या दुमजली संग्रहालयात सन यातसेनच्या जीवनाचे अनेक टप्पे आणि अनेक पैलू रंगविले आहेत. त्यांनी शेतकरी आणि कामगारांना एकत्र आणून राज्यांविरूद्ध बंड कसे केले याचे सविस्तर सचित्र वर्णन येथे सापडते. त्याचबरोबर चीनचा अध्यक्ष म्हणून पद ग्रहण केल्यानंतर त्याने काय काय केले याचेही सचित्र वर्णन सापडते.



**नवीन संग्रहालय**

झोगशान येथील स्मारकाला भेट देऊन आम्ही परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. परतीच्या प्रवासात आमच्या तोंडी दोनच गोष्टी होत्या. एक तर सन यातसेनचा चीनच्या बांधणीत सहभाग आणि दुसरे म्हणजे स्मारक सांभाळून ठेवण्याची सध्याच्या सरकारची पद्धत. अशा स्मारकाने आपल्या पुढाऱ्याची आठवण तर राहतेच त्याचबरोबर पुढच्या पिढीला प्रेरणा देखील मिळते.



**सन यात सेनचा पुतळा**

**– डॉ. सुधाकर आगरकर**
सी–१४, विसावा
वैभव नगरी, कल्याण शीळ रोड
काटई ता. कल्याण
जि. ठाणे– ४२१२०४

•••

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# श्रीमत् भगवद्गीता - अध्याय पहिला
# अर्जुन विषाद योग

*श्रीमत् भगवद्गीतेवरील लेखमाला या अंकापासून सुरु करीत आहोत - संपादक*

**अध्याय १ विषय : विषाद योग**

**श्लोक १ ते ११ (युद्ध भूमी, व्यूह प्रमुख वीर)**

धृतराष्ट्र संजयला विचारतो, हे संजया धर्मक्षेत्र असलेल्या कुरुक्षेत्राच्या ठिकाणी माझी मुले व पंडूची मुले युद्ध करण्याच्या इच्छेने एकत्र झालेली आहेत. त्यांच्याबद्दलचे वर्तमान काय आहे.

तेव्हा संजय म्हणतो, राजन् पांडवांची सेना, व्यूह रचून उभी ठाकली असे पाहून राजा दुर्योधन आचार्यांजवळ जाऊन त्यांना म्हणाला, आचार्य आपला बुद्धिमान शिष्य द्रुपदाचा मुलगा धृष्टद्युम्न याने व्यूहरचना केली आहे. त्या विशाल पांडव सेनेकडे पहा. या सेनेत तुम्हांला भीम अर्जुनासारखे रणशूर आणि मोठे धनुर्धारी युयुधान (सात्यकी) व विराट, महारथी द्रुपद, धृष्टकेतु, चेकितान, पराक्रमी काशिराज, पुरुजित् कुंतिभोज, नरश्रेष्ठ शैव्य, शूर युधामन्यु, वीर्यशाली उत्तमौजा, सुभद्रापुत्र (अभिमन्यू) आणि द्रौपदीचे पाच महारथी पुत्र दिसतील. आता आमच्याकडील जे प्रमुख वीर आहेत. त्यांच्याबद्दल माहिती देतो. आपणाला या मंडळींना सूचना देता याव्यात यासाठीच यांच्या नावाचा उल्लेख करत आहे. आपण स्वतः भीष्म, कर्ण, रणविजयी कृप अश्वत्थामा, सोमदत्ताचा मुलगा (भूरिश्रवा) आणखी शेकडो वीर जे मजसाठी आपल्या जीवावर उदार होऊन युद्ध करण्यास सज्ज आहेत ते अनेकविध शस्त्रे चालविण्यात कुशल आहेत. यांना पहा.

अशा प्रकारे दोन्ही सैन्यांची तुलना करावयाची झाल्यास भीष्माकडून रक्षण केले जाणारे सैन्य मोठे आहे आणि भीमाकडून रक्षण केले जाणारे सैन्य मर्यादित आहे.

आचार्य आता तुम्ही सर्वांनी सर्व व्यूहाच्या ठिकाणी स्थिर उभे राहून सर्व बाजूंनी भीष्मांचे रक्षण करावे.

**श्लोक १२ ते १९ (दोन्ही बाजूच्या सैन्याकडून रणशिंग फुंकले गेले.)**

संजय पुढे म्हणतो - राजन् दुर्योधनाला आनंद वाटावा म्हणून कौरवातील अतिवृद्ध तरीही पराक्रमी पितामह भीष्मांनी मोठ्याने सिंहनाद करत रणशिंग फुंकले (शंख) त्यानंतर अनेक शंख, नौबती, डंके, मृदंग आणि गोमुखे वाजू लागली. तो निनाद फारच मोठा होता. यानंतर शुभ्र घोडे जोडलेल्या भव्य रथात बसून श्रीकृष्ण व अर्जुन तेथे उपस्थित होते. त्या दोघांनी आपले दिव्य शंख फुंकले. श्रीकृष्णांनी पांचजन्य नावाचा शंख फुंकला. अर्जुनाने देवदत्त, अचाट साहसी भीमसेनाने पौंड् नावाचा शंख फुंकला. युधिष्ठिराने अनंत विजय नावाचा शंख फुंकला, नकुल सहदेवानी सुघोष व मणि पुष्पक नावाचे शंख फुंकले. महाधर्नुधारी काशिराज महारथी शिखंडी धृष्टद्युम्न, राजा विराट, कधी ही पराभव न पत्करणारा सात्यकी, राजा द्रुपद, द्रौपदीचे सारे पुत्र, सुभद्रा पुत्र वीर अभिमन्यू इत्यादी सर्वांनी आपापले शंख फुंकले. भय निर्माण करणाऱ्या त्या नादाने आकाश आणि पृथ्वी दुमदुमून गेली.त्या घोषाने दुर्योधनादी धृतराष्ट्र पुत्रांची ह्रदये विदीर्ण झाली.

**श्लोक २०:२७ अर्जुनाकडून सैन्य निरीक्षण**

आता दोन्ही कडील सेना ठाकठीक उभ्या आहेत. शास्त्रांचा खणखणाट सुरु होणार हे पाहून हनुमानाचे चिन्ह ध्वजावर असलेल्या अर्जुनाने आपले धनुष्य उचलले व

श्रीकृष्णाला म्हणाला, 'हे श्रीकृष्णा, या दोन्ही सैन्यांच्यामध्ये माझा रथ नेऊन उभा कर. म्हणजे मी येथे युद्धासाठी उभे ठाकलेल्या वीरांना पाहून घेतो. मला कोणाबरोबर लढावयाचे आहे ते पाहतो. दुष्ट बुद्धीच्या दुर्योधनाचे प्रिय करणाऱ्या, एकत्र जमलेल्या, लढू इच्छिणाऱ्या, वीरांचेही निरीक्षण करतो. संजय पुढे म्हणतो-राजा धृतराष्ट्रा-अर्जुन श्रीकृष्णाला असे बोलताच त्याने भीष्म, द्रोण आणि सर्व राजांच्या अग्रभागी रथ नेऊन उभा करत म्हणाला-अर्जुना या एकत्र जमलेल्या कौरवांना पहा.

तेव्हा तेथे अर्जुनाने दोन्ही सैन्यात जमलेले आपले सर्व इष्टमित्र, भाऊबंद, पूज्य वडीलधारी मंडळी, सारे, स्नेही आदी पाहिले. हे पाहताच अर्जुन करुणेने व्याप्त झाला. त्याला खिन्नता आली आणि कळवळून तो म्हणाला- हे कृष्णा युद्धासाठी उभे ठाकलेले आपलेच बांधव पाहून माझी शस्त्रे शिथिल झाली, तोंडाला कोरड पडली, अंगात कापरे भरले आहे. अंगावर काटा उभा राहिला आहे.

श्लोक २८.४७ - अर्जुनाच्या ठिकाणी करुणा निर्माण होते. तो शोकाकुल होतो.

कृष्णा, गांडीव धनुष्य माझ्या हातातून गळून खाली पडत आहे. माझ्या त्वचेचा दाह होऊ लागला आहे. आता मला उभेही राहवत नाही, माझे डोके गरगरू लागले आहे. हे केशवा, मला सर्व लक्षणे विपरित दिसत आहेत. आपल्याच आप्त बांधवाना युद्धात ठार मारून आमचे काही कल्याण होईल असे वाटत नाही. हे कृष्णा मला विजयाची इच्छा नाही, मला राज्य नको आणि ती सुखे पण. हे गोविंदा, आम्हांला राज्य घेऊन तरी काय करावयाचे? राज्यभोगांनी काय हित होणार? आम्ही जिवंत राहूनही काय लाभ होणार? ज्यांच्यासाठी आम्ही राज्य, भोग आणि सुखे यांची इच्छा केली तेच आमचे आचार्य, पितामह, पुत्र, सासरे आणि बांधव आपल्या प्राणांची, बांधवांची पर्वा न करता युद्धाकरता येथे उभे आहेत. हे मधुसूदना हे मला ठार मारू पाहातील तरी त्रैलाक्याच्या राज्यासाठी देखील यांना मारण्याची इच्छा मी करू शकत नाही. तर मग पृथ्वीच्या राज्याची मातबरी ती काय? हे जनार्दना धृतराष्ट्र पुत्रांना मारून आमचे कोणते हित होणार आहे? या आततायी लोकांना ठार मारल्याने मात्र आम्हांला पापच लागेल. म्हणून कौरवांना, आमच्या बंधूना ठार मारणे आम्हांला योग्य नाही. हे माधवा, आपल्याच आप्तांना मारून आम्ही कसे बरे सुखी होऊ? आणखी बघ, कौरवांचे चित्र लोभाने भ्रष्ट झाल्या कारणाने त्यांना कुलक्षय केल्याचा दोष व मित्र द्रोह हे पातक दिसत नाही. म्हणून हे जनार्दना कुलक्षयाचा दोष आम्हांला दिसत असतानाही आम्ही या पातकापासून बाजूला होण्याचा विचार का बरे करू नये? कुलक्षय झाल्याने काय आपत्ती ओढवतात पहा. सनातन-परंपरेने चालत आलेले कुलधर्म नष्ट होतात. कुलधर्म नष्ट झाल्याने अधर्माचा प्रभाव बुद्धीवर पडतो. हे कृष्णा, अधर्माने कुल वेढले गेले म्हणजे कुलस्त्रिया दुराचारी बनतात. हे यादवा, स्त्रिया दुराचारी झाल्या म्हणजे वर्ण संकर होतो. संकर झाला असता सर्वच कुल नरकात जाते व त्यांच्या पितरांना अन्न, पाणी, संतर्पण न झाल्याने पतित होतात. यामुळे पुरातन कुलधर्म व जातिधर्म लुप्त होतात. हे जनार्दना ज्यांचे कुलधर्म नष्ट होतात ते निश्चयेकरून नरकात खितपत पडतात असे आम्ही ऐकत आहोत. अरेरे आम्ही केवढे घोर पातक करण्यास धजावलो आहोत. राज्य सुखाच्या लोभाने आम्ही स्वजनांना ठार मारण्यास आम्ही तयार झालो. कृष्णा, मला वाटते हे शस्त्रधारी धृतराष्ट्र पुत्र शस्त्र आणि प्रतिकार शून्य अशा मला या युद्धात ठार मारतील तर ते अधिक कल्याणकारक होईल. पुढे संजय राजाला सांगतो, हे राजन् अशा प्रकारे बोलून रणभूमीवर शोकाकूल व्याकूल झालेला अर्जुन धनुष्यबाण टाकून रथातच मटकन खाली बसला.

श्रीकृष्णाने अर्जुनाला निमित्त करुन विश्वातील सर्व मानवांसाठी महान उपदेश केला आहे. या अध्यायात दोन्ही कडील सैन्यांचे वर्णन, अर्जुनाला दोन्ही कडील सैन्य पाहावे

अशी इच्छा होते, त्याच्या इच्छेप्रमाणे श्रीकृष्ण दोन्ही सैन्याच्यामध्ये त्याचा रथ आणतो. अर्जुनाचे निरीक्षण त्यानंतर आपल्याच बांधवांच्या नाशाच्या विचाराने त्याचे मन विषण्ण होते. असा विषाद निर्माण झाल्याने ते राज्य नको, ते भोग नकोत असे त्याला वाटते. नैराश्याच्या भावनेने भारून जावून आपले कल्याण हिंसेने प्राप्त होण्याऱ्या भोगात नसून वैराग्यात आहे असे त्याच्या मनाने घेतले व तो धनुष्य बाण टाकून रथाखाली जवळच बसून राहिला.

**या अध्यायात आलेल्या शब्दांचा विचार**

१. **कुरुक्षेत्र** – या क्षेत्राचे महात्म्य वर्णन महाभारत वन पर्व ८३ वा अध्याय; तसेच शल्य पर्व अध्याय ५३ इथे आले आहे. हे क्षेत्र सरस्वती नदीच्या दक्षिणेला दृषद्वती नदीच्या उत्तरेला या दोआबात आहे. हे स्थान सांप्रत दिल्लीच्या उत्तरेस व अंबालाच्या दक्षिणेस आहे. तिथे कुरुक्षेत्र हे स्टेशन आहे. या क्षेत्रात पूर्वी अग्नि, इंद्र, ब्रह्मा आदि देवतांनी तपश्चर्या केली होती. तसेच कुरु राजाने इथे कष्टपूर्वक कृषी इत्यादी केली, म्हणून या भूमीला कुरुक्षेत्र व धर्मक्षेत्र असे म्हटले जाते.

२. **धृष्टद्युम्न** – हा द्रुपद राजाचा मुलगा, द्रोणाचा शिष्य, अत्यंत बुद्धिमान असा त्याचा परिचय सांगून दुर्योधनाने द्रोणाला डिवचले आहे.

३. **युयुधान** – सात्यकीचे हे दुसरे नाव. हा यदुवंशातील राजा. शनिक याचा पुत्र, अर्जुनाचा शिष्य.

४. **विराट** – मत्स्य देशाचा परम धार्मिक राजा. याच्या राज्यात पांडव अज्ञातरीत्या राहिले. याचा मुलगी उत्तरा हिचा विवाह अर्जुन पुत्र अभिमन्यूशी झाला.

५. **द्रुपद** – पांचाळ देशचा राजा. पृषतचा पुत्र, राजा पृषत् व भरद्वाज मुनी यांचे सख्य होते. द्रुपद बालक असताना भरद्वाज आश्रमात शिक्षण घेत होता. तिथे द्रोणाबरोबर मैत्री झाली. पृषत् राजाच्या पश्चात द्रुपद राजा झाला. द्रोणाने काही कारणाने त्याजकडे जाऊन मित्रता प्रगट केली. द्रुपदाला ही गोष्ट आवडली नाही, मैत्री बरोबरीच्या लोकांशी होऊ शकते असे सांगून त्याने द्रोणाचा अपमान केला. याचे उट्टे द्रोणांनी अर्जुनाच्या गुरुदक्षिणेद्वारे काढले. त्याचे अर्धेराज्य बळकावले. द्रुपदाने वरकरणी त्यांच्याशी मैत्री केली, परंतु मनात क्षोभ निर्माण झाला होता. द्रोणाला ठार मारू शकेल असा पुत्र त्याला हवा होता. त्यासाठी यज्ञ केला. त्यातून धृष्टद्युम्न व याज्ञसेनी जन्माला आली. द्रौपदीचा विवाह पांडवाबरोबर झाला. द्रुपद राजा शूर होता.

६. **धृष्टकेतु** – चेदी देशाचा राजा. शिशुपाल पुत्र. युद्धात द्रोणांच्या हातून मारला गेला.

७. **चेकितान** – वृष्णि वंशातील यादव. शूरवीर योद्धा. पांडवाकडील एक अक्षौहिणीचा सेनापति हा दुर्योधनाच्या हातून मारला गेला.

८. **काशिराज** – काशी देशाचा राजा. मोठा शूर योद्धा.

९. **पुरुजित् व कुंतिभोज** – कुंतीचे भाऊ, पांडवांचा मामा. द्रोणाचार्यांकडून दोघेही मारले गेले.

१०. **शैब्य** – युधिष्ठिराचा सासरा. देवकी या मुलीशी युधिष्ठिराचे लग्न झाले होते.

११. **युधामन्यु व उत्तमौजा** – दोघे बंधू पांचाल देशाचे राजकुमार, अर्जुनाच्या रथाच्या चाकांचे रक्षण उभयतांकडे होते. हे मोठे शूर होते. रात्री झोपेत हे दोघे अश्वत्थामाकडून मारले गेले.

१२. **अभिमन्यू** – अर्जुन पुत्र. हाच चक्रव्यूहात अडकला. शर्थीने लढला. त्याला कुमक मिळू शकली नाही. द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा बृहत्बल व कृतवर्मा अशा सहा वीरांनी त्याला घेरले. तो एकाकी लढला. दुःशासनाच्या मुलाने त्याच्यावर गदेचा प्रहार केला व त्याने तो मेला.

१३. **द्रौपदीच्या पाच पुत्रांची नावे** : प्रतिविन्ध्य,

सुतसोम, श्रुतकर्मा, शतानीक, श्रुतसेन हे क्रमशः युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल व सहदेव यांची औरस संतती. रात्री झोपेत अश्वत्थाम्याने यांना ठार मारले.

१४. **द्रोणाचार्य** – महर्षि भरद्वाज पुत्र. अग्निवेश व परशुराम यांजकडून समस्त शस्त्र अस्त्र विद्या संपादिली. वेद, वेदांग अभ्यासक, तपस्वी धनुर्वेद व अस्त्रविद्येत अत्यंत मर्मज्ञ, अनुभवी, युद्धशास्त्र नीतिज्ञ, साहसी व वीर. ब्रह्मास्त्र आग्नेयास्त्र याची चांगली माहिती होती. यांचा विवाह शरद्वान ऋषि पुत्री कृपीबरोबर झाला. अश्वत्थामा हा त्यांचा पुत्र. द्रोण व द्रुपद बालपणचे मित्र द्रुपद राजा झाल्यानंतर मैत्री संपली. द्रुपदाने अपमान ही केला. कौरव पांडव यांना धनुर्विद्या शिकविली. गुरुदक्षिणे प्रीत्यर्थ द्रुपदाला पकडून आणण्यास सांगितले. द्रुपदाचा पराभव करून त्याला पकडून आणण्यात आले. द्रोणांनी त्याला मुक्त केले. मात्र त्याचे निम्मे राज्य घेतले. भारतीय युद्धात पांच दिवस कौरवांचे सेनापती होते. अश्वत्थामा मारला गेला हे ऐकून त्यांनी शस्त्र संन्यास केला. ताबडतोब धृष्टद्युम्नाने ही संधी साधून त्यांचा शिरच्छेद केला.

१५. **भीष्म** – शंतनु पुत्र. गंगेपासून याचा जन्म झाला. हा वसूचा अवतार मूळ नाव देवदत्त. वडिलांना सत्यवती प्राप्त व्हावी म्हणून आजन्म ब्रह्मचारी राहण्याची घोर प्रतिज्ञा केली. त्यामुळे त्यांचे भीष्म हे नाव रुढ झाले. 'तू इच्छा मरणी होशील' असा पित्याने त्याला आशीर्वाद दिला. भीष्म अत्यंत तेजस्वी शस्त्र व शास्त्र यात पारंगत अनुभवी, महान ज्ञानी, वीर योद्धा, दृढनिश्चयी महापुरुष होते. महाभारत युद्धात यांच्या तोडीचा वीर पुरुष नव्हता. ते धारातीर्थावर शय्येवर पडले आणि उत्तरायण लागल्यावर स्वर्गवासी झाले.

१६. **कर्ण** – कुंतीचा कानीन पुत्र. कौमार्यावस्थेत मूल झाल्याने त्या मुलाला तिने गंगेत सोडून दिले. अधिरथ व राधा यांच्या हाती ते बालक लागले. त्यांनी बालकाला सांभाळले. त्याचे नाव वसुषेण हे दिले. त्यांनी परशुरामांकडून शस्त्र, अस्त्र विद्या संपादन केली. तो धनुर्विद्येत अर्जुनाच्या तोडीस तोड असा धनुर्धर होता. दुर्योधनाशी घनिष्ठ मैत्री होती. दानशूर इंद्राला आपली अंगची कर्णकुंडले कापून दिली. इंद्राने त्याला वासवी शक्ती दिली. ती त्याने घटोत्कचावर वापरली. भारतीय युद्धात द्रोणानंतर तीन दिवस कर्ण सेनापती म्हणून राहिला. अर्जुनाकडून त्याला वीरगती प्राप्त झाली.

१७. **कृप** – गौतम वंशातील महर्षि शरद्वान याचा पुत्र. धनुर्विद्येत निष्णात व अनुभवी योद्धा. महाराज शंतनु याने दयाळुपणे याचे पालन केले म्हणून याचे नाव कृप असे पडले. बहिणीला कृपि असे नाव ठेवण्यात आले. हिचा विवाह द्रोणाचार्यांशी झाला. वेदशास्त्र जाणकार, धर्मात्मा सद्‌गुण संपन्न सदाचारी म्हणून कृप ओळखले जात. द्रोणापूर्वी कौरव पांडवाना शस्त्र विद्या शिकवीत असत. उत्तम योद्धा व शत्रूवर विजय प्राप्त करणारा अशी यांची ख्याती.

१८. **अश्वत्थामा** – द्रोणाचार्यांचा मुलगा. शस्त्रास्त्र विद्येत निपुण. मात्र अत्यंत आततायी. याने झोपलेल्या पांडव पुत्रांना पांडव समजून रात्री ठार मारले.

१९. **विकर्ण** – दुर्योधनाचा भाऊ एक महारथी. द्रौपदी वस्त्रहरणाच्या वेळी यानी एकट्याने आवाज उठविला व तीव्र शब्दात अन्याय व अधर्म आचरणाला वाचा फोडली. त्यांनी स्पष्ट सांगितले आम्ही द्रौपदीला जिंकले नाही. तिच्या प्रश्नाला उत्तर देण्याचे टाळणे अन्यायकारक आहे.

२०. **सौमदत्ति** – सोमदत्त पुत्र भूरिश्रवा. शंतनूचा मोठा भाऊ बाल्हिक याचा नातू. हा धर्मात्मा होता. युद्ध कलेत निपुण व शूर होता. अनेक यज्ञ याग यांनी केले. भारतीय युद्धात सात्यकीच्या हातून मरण आले.

२१. **शिखंडी** – शिखंडी व धृष्टद्युम्न ही दोनही मुले द्रुपद

विजय, शांती, समृद्धी ज्याला हवी आहे, त्यास बह्मांड समजून घेण्यावाचून गत्यंतर नाही.

राजाची. शिखंडी मोठा होता. द्रुपदाला संतान नसल्याने त्याने शंकराची आराधना केली. त्याला कन्यारत्न झाले. शंकराने त्याला सांगितले यथाकाली त्याला पुरुषत्व प्राप्त होईल. द्रुपदाने मुलासारखे त्याचे पालन पोषण केले. दशार्त देशाचा राजा हिरण्यवर्मा यांच्या कन्येशी त्याचा विवाह करुन दिला. शिखंडी पुरुष नसून स्त्री आहे हे तेव्हा कळले. हिरण्यवर्माने द्रुपदावर स्वारी केली. शिखंडी देवताराधनेसाठी पळून गेला. वनात स्थूणाकर्ण नावाच्या यक्षाशी गाठ पडली. त्यांनी परम कारुणकतेने आपले पुरुषत्व देऊन काही काळ स्त्रीत्व स्वीकारले. तो शहरात परत आला आपण पुरुष आहोत हे सिद्ध केले. युद्धाचा प्रसंग टळला. कुबेराच्या शापाने स्थूणाकर्ण हा कायमचा स्त्री राहिला. शिखंडीला पुरुषत्व परत करावे लागले नाही. भीष्मांना हा इतिहास माहीत होता. यामुळे त्याजवर ते शस्त्र प्रहार करत नसत. शिखंडी महारथी योद्धा होता. याला पुढे उभे करुन अर्जुनाने भीष्मावर बाण मारले व त्यांना धारातीर्थी निजविले.

**श्रीकृष्णाची नावे**

हृषीकेश – हृशिकानि–इन्द्रियाणि तेषांईशः म्हणजे केशव. दुसरा अर्थ हर्षात्–सुखात् ऐश्वर्यात् – सुख ऐश्वर्य आदि कारणाने तो हृषिकेश होता.

माधव, केशव, अच्युत.

**अर्जुनाची नावे, गांडीव धनुष्य व देवदत्त शंख आणि रथ**

**धनंजय** – राजसूय यज्ञाच्या वेळी अनेक राजाना जिंकून धन आणले म्हणून त्याचे नांव धनंजय पडले.

**गुडाकेश** – गुडाका–निद्रा ईश–स्वामी, निद्रेवर प्रभुत्व असणारा. न झोपता अर्जुन राहात असे. आलस्य त्याला स्पर्शही करत नसे.

**गांडीव** – अर्जुनाचे प्रसिद्ध धनुष्य, अत्यंत बलशाली. या धनुष्यामुळे देवता व मनुष्य यांच्यावर अर्जुनाला सहज विजय प्राप्त करता येत असे. खांडव वन दहन प्रसंगी अग्नीने वरुणाकडून अर्जुनाला हे धनुष्य द्यावयास लावले.

**देवदत्त** – हा शंख अर्जुनाला निवात कवच दैत्याशी युद्ध करताना इंद्रानी अर्जुनाला देवदत्त नावाचा शंख दिला. या शंखाचा आवाज भयानक होता. शत्रूची गाळण उडत असे.

अर्जुनाचा रथ – मोठा सुंदर होता. तो सोन्याने मढविलेला होता. तेजोमय व मजबूत होता. ध्वजावर हनुमान विराजित झाला होता. हा रथ अग्नीने खांडव वन फस्त करण्यावेळी प्रसन्न होऊन अर्जुनाला दिला होता. त्या रथाला चार शुभ्र घोडे होते. हे घोडे त्याला चित्ररथ गंधर्वाने दिले होते.

कृष्णाचा शंख – पांचजन्य. पंचजन नावाच्या असुराला ठार करुन त्याला शंख स्वरुपात आपल्या जवळ ठेविले.

**काही विशेष शब्द**

**आततायी** – आततायिनं आयान्तं हन्यादेव अविचारयन्। आततायी कोण?

अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिः धनापहा। क्षेत्रदारापहर्ताच षडेते आततायिनः। शुक्रनीति आग लावणारा, विष प्राशन करविणारा, हातात शस्त्र घेऊन मारावयास येणारा, संपत्ती हरण करणारा, देश काबीज करणारा, स्त्रीला पळविणारा हे सहा आततायी होत. यांतील बरीचशी लक्षणे कौरवांना लागू पडतात. लाक्षागृहात जाळण्याचा प्रयत्न, भीमाला विष पाजून ठार मारण्याचा प्रयत्न, द्यूत खेळून कपटाने देश व संपत्ती बळकावले. द्रौपदीला भर सभेत खेचून आणून अपमानास्पद वागणूक केली. जयद्रथाने द्रौपदीला पळवून नेले होते. असे पापिष्ठ लोक कुलाचाराचा नाश करणारे असतात. त्यांना मारण्याने मारणाऱ्याला पाप लागत नाही. त्यांना मारणे हेच उचित.

**कुलधर्म** – घराण्यातील सभ्यता संस्कृती याचे पालन असे न करण्याने अनाचार वाढतो. अधर्मापासून वाचण्यासाठी पाच गोष्टी महत्वाच्या – १) ईश्वराचे भय २) शास्त्राचे पालन ३) कुलाचार पालन ४) राज्यातील कायद्यांचे पालन

५) श्रद्धायुक्त राहणे. म्हणजे स्वैराचार पसरत नाही, धर्माचे उच्चाटन होत नाही असे न झाल्यास अधोगति.

**संकर** – भेसळ उच्छृंखळपणा. श्रेष्ठ जीवन मूल्ये धुळीला मिळविणे, त्याची थट्टा होणे, सर्व मर्यादांना मूठमाती देणे अशा हीन वर्तनाच्या मातापित्यापासून होणारी संतती उत्तम निघेल अशा आशा नष्ट होणे, हेच संकराचे परिणाम संकर म्हणजे संस्कार हीनता वाढीला लागणे.

### अक्षौहिणी संख्या

पत्ति – १ रथ १ हत्ती ५ सैनिक ३ घोडे (रथाला २ माणसे हत्ती २ माणसे घोड्यावर प्रत्येकी १ माणूस – एकूण १२.

३ पत्ति – १ सेनाप्रमुख ( संख्या १२ x ३ = ३६) ३ सेनाप्रमुख = १ गुलम् संख्या ३६ x ३ = १०८

३ गुलम् = १ गण (संख्या १०८ x ३ = ३२४),

३ गण = १ वाहिनी (३२४ x ३ = ९७२)

३ वाहिनी = १ पृतना (९७२ x ३ = २९१६)

३ पृतना = १ चमू (२९१६ x ३ = ८७४८)

३ चमू = १ आणिकिनी (८७४८ x ३ = २६२४४)

१० आणिकिनी = १ अक्षौहिणी
(२६२४४ x १० = २,६२,४४०)

१८ अक्षौहिणी=२,६२,४४० x १८ = ४७,२३,९२०

(वरील आकडे गीता मंथन या ग्रंथावरून)

काही ग्रंथांतून वेगळी प्रमाणेही पाहावयास मिळतात. कल्पना येण्यासाठी वरील आकड्यांचा उपयोग होईल.

**– श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

## विद्या प्रसारक मंडळाचे स्वप्न

*वेळणेश्वर पाहिलं,*
*ऐकली गाज समुद्राची.*
*परशुरामाने कोकण निर्माण केलं ...*
*त्याचाच आवाज तो*
*या सर्वांशी नातं जोडलं*
*आमच्या विद्या प्रसारक मंडळाने*
*टाकत दोन पावले पुढे*
*ओळखून गरज काळाची*
*परशुरामाच्या हातातील परशु घेत*
*घातला घाव कोकणच्या कातळावर*
*आणि सुरू झाली कहाणी*
*विराट स्वप्न प्रत्यक्षात येण्याची ...*
*अभियांत्रिकी गुरुकुलाची ओळखत गरज*
*वर्तमानाचे आरोग्य जपणाऱ्या*
*आमच्या डॉक्टरांनी*
*स्टेथस्कोप लावला कोकणच्या मातीला*
*तिची नाडी ओळखत*
*केली धडपड सुरू*
*डॉक्टरांची विजय मिळवणारी स्पंदने ऐकत*
*समुद्रही घाबरला.*
*आता आपला प्रतिस्पर्धी समोर आहे*
*असा विचार करत, क्षणभर थरारला ...*

**– मोहन पाठक**

●●●

# स्वातंत्र्यवीर श्री. विनायक दामोदर तथा तात्याराव सावरकर यांची नाशिकला भव्य मिरवणूक ..एक आठवण...

*फेब्रुवारीमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांची पुण्यतिथी आहे. त्यानिमित्ताने हा विशेष लेख. – संपादक*

बॅरिस्टर विनायक दामोदर तथा तात्याराव सावरकर सर्वांना माहीत आहेत. पण त्यांची नासिकला भव्य मिरवणूक १९३५ किंवा १९३६ मध्ये निघाली होती. त्या मिरवणुकीची आठवण कायम लक्षात राहिली; म्हणून तिच्याविषयी थोडे लिहावे; या विचाराने लेखाचा प्रयत्न केला. मी वयाने अगदी लहान. ९ किंवा १० वर्षाचा असेन. त्या मिरवणुकीची माहिती व माझा मिरवणुकीशी संबंध कसा आला याबद्दल उलगडा व्हावा म्हणून थोडी प्रस्तावना...

मी ९ किंवा १० वर्षाचा शाळेत जाणारा विद्यार्थी होतो. याविषयी थोडी माहिती प्रथम सांगून मिरवणुकीबद्दल खुलासेवार लिहीत आहे.


**स्वातंत्र्यवीर सावरकर**

माझे वडिल नासिकला एका सुप्रसिद्ध वकिलांकडे नोकरीस होते. त्यांची कोर्टाची तयारी करायची, कागद पत्रांची बॅग भरायची, त्यांना चहा नाष्टा, दुपारच्या सुट्टीत घेऊन कोर्टात जायचे. कधी जेवण झाले नसेल तर जेवणही घेऊन जायचे, अशी कामे वडील करीत असत. फौजदारी वकील असल्यामुळे त्यांचेकडे गावोगावच्या केसेस येत असत. दांडगी वकीली प्रॅक्टिस होती. वकीलांना दोन मुले–एक मुलगा एक मुलगी. मुलांची आई मुलांच्या लहानपणीच वारली. तेव्हा वकीलांनी त्या मुलांचा सांभाळ करण्याचे कामही माझ्या वडीलांकडे सोपविले होते. माझ्या वडीलांनी तेही काम अत्यंत मनापासून केले. तेव्हा वकीलांनी माझ्या वडीलांना सांगितले होते की तुझ्या पहिल्या मुलाच्या शिक्षणाची व्यवस्था माझ्याकडेच करीन. काही दिवसांनी एका आजाराने त्यांचे निधन झाले. त्यांचा मुलगाही वकीली शिक्षण पूर्ण करून नुकताच वकीली करू लागला होता. वडीलांप्रमाणे त्याचीही फौजदारी वकीली जोरात चालत होती. मृत्यूपूर्वी माझ्या वडीलांना दिलेला शब्द मुलाने पाळला. माझा जन्म झाल्यानंतर तीन भावंडे झाली. दरम्यान माझे वय ५–६ वर्षांचे झाले असेल. तेव्हा शाळेत जाण्यापासून माझी रवानगी धाकट्या वकिलांकडे झाली. माझे मॅट्रीकपर्यंत शिक्षण त्यांच्या घरी राहून सुरु झाले.

नाशिकमध्ये सुप्रसिद्ध वकिलांचा मुलगा म्हणून धाकट्या वकिलांची ख्याती व नाव वाढत होते. ते १९३२ / १९३३ मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहर प्रमुख होते व नाशिकमध्ये त्यांचे मोठे नाव होते.

१९३५–३६ मध्ये श्री. तात्याराव सावरकरांचे नाव स्वातंत्र्यवीर म्हणून बरेच गाजत होते. याशिवाय त्यांना बॅरिस्टर विनायक दामोदर सावरकर या नावानेही लोक ओळखत होते. त्यावेळी मी ९–१० वर्षाचा शाळकरी मुलगा म्हणून धाकट्या वकिलांच्या घरी रहात होतो. जन्मठेपेची शिक्षा पूर्ण झाल्यानंतर श्री. तात्यारावांची ब्रिटिश सरकारने त्या सुमारास नुकतीच नजर कैदेतून मुक्तता केली होती. तात्याराव रत्नागिरीला त्यांच्या घरी रहात होते.

नाशिकमध्ये श्री. तात्यारावांचे भाषण ठरले होते.

द्वैत संपून गेलं आहे असा भाव म्हणजे भक्ती.

त्यानिमित्ताने श्री. तात्याराव, त्यांचे बंधू बाबाराव आणि इतर काही मंडळी नाशिकला येणार होते. त्या सर्वांचा मुक्काम दोन दिवस मी रहात होतो त्या वकिलांच्या घरी होता. भाषणाच्या दिवशी सकाळी १० वाजता नाशकात तात्यारावांची भव्य मिरवणूक काढण्याचे ठरले होते. मिरवणुकीसाठी एक मोटार गाडीही ठरविली होती. त्यावेळी नाशिकमध्ये मोटारगाड्या अगदी बोटावर मोजण्याजोग्या होत्या. त्यात एक गाडी (फोर्ड कंपनीची) छत कापडी असलेली होती. काही श्रीमंत लोकं लग्नाच्या वरातीसाठी किंवा मुंजीच्या भिक्षावळीसाठी भाड्याने वापरत असत. त्या गाडीचे संपूर्ण छत काढून घडी करता येत असे. ती गाडी मिरवणुकीस ठरविली होती. मिरवणूक वकीलाच्या घरुन सुरु होऊन संपूर्ण नासिकमध्ये फिरणार होती. सकाळी १० ते दुपारी १.३० वाजेपर्यंत मिरवणूक चालली होती. मागच्या सिटवर गालीचा होता. त्यावर हार घातलेले तात्याराव बसले होते आणि पुढच्या सिटवर ड्रायव्हरच्या शेजारी पाण्याचा तांब्या पेला आणि एक मोठा टॉवेल घेऊन मला बसवले होते.

मिरवणुकीला गाडीच्या मागे पुढे लोकांचे थवे. अशा परिस्थितीत मिरवणूक चालली होती. सावरकरकी जय! स्वातंत्र्यवीर सावरकर की जय! इत्यादी मोठ्याने जयजयकार संपूर्ण रस्त्याने चालला होता. अनेक ठिकाणी मिरवणुकीची गाडी थांबवून लोक सावरकरांना हार घालीत होते. एकंदर देखावा आणि वातावरण अतिशय प्रसन्न होते. उन्हाची वेळ होती परंतु त्याकडे कोणाचेही लक्ष नव्हते. सुमारे २।। ते ३ तास मिरवणूक संपूर्ण नाशिकमध्ये फिरली. वाटेत अनेक ठिकाणी लोकांना पाणी पिण्याची व्यवस्था केली होती. श्री. तात्याराव मधून मधून मोटारीत उभे राहुन घरांच्या वरच्या मजल्यावरील लोकांना पाहून हात उंचावत होते. दुपारी १।। ते २ च्या दरम्यान मिरवणूक घरी परत आली. हल्लीच्याप्रमाणे फोटो वा विडीओ काढण्याचे कॅमेरे वगैरे वातावरण त्यावेळी अजिबात नव्हते.

मिरवणुकीच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता गोदावरी नदीच्या तिरावर य. म. पटांगण म्हणून पुढाऱ्यांच्या किंवा वक्त्यांच्या भाषणासाठी ठरलेली जागा नाशिकमध्ये प्रसिद्ध आहे. तेथे श्री. तात्यारावांचे भाषण ठेवलेले होते. त्यासाठी हल्लीच्याप्रमाणे ध्वनीयंत्रणेची सुविधा नव्हती. य. म. पटांगण म्हणजे यशवंतराव महाराज पटांगण. कै. यशवंतराव देव म्हणून एक प्रसिद्ध मामलेदार पूर्वी होऊन गेले. ते अतिशय धार्मिक वृत्तीचे होते म्हणून लोक त्यांना यशवंतराव महाराज म्हणत असतं. त्यांचे गोदावरी तिरावर एक भव्य समाधी मंदिर प्रसिद्ध आहे. त्या मंदिराच्या समोरच दगडी चिरांचे मोकळे पटांगण (य.म. पटांगण म्हणून अद्यापी प्रसिद्ध आहे.) मंदिरासमोर एक लाकडी टेबल. त्यावर पांढरी चादर व बाजूला २/४ खुर्च्या एवढीच सभेसाठी व्यवस्था होती. टेबलासमोर २-३ सतरंज्या फक्त होत्या. त्यावर थोडेसे लोक बसले होते. याशिवाय लोकांचा अथांग सागर पटांगणात खुप दूरपर्यंत उभा होता. सायंकाळी ६ वाजता भाषणास सुरुवात झाली. भाषण चालू असताना मध्येच श्री. तात्यारावांनी लोकांना ''ऐकू येतं का?'' असे विचारले. तेव्हा काही लोक म्हणाले, ''थोडे मोठ्याने बोला'' तेव्हा श्री. तात्याराव टेबलावर उभे राहून थोड्या मोठ्या आवाजात भाषण करु लागले. लोकांनी मंत्रमुग्ध होऊन संपूर्ण १।। तास चाललेले भाषण ऐकले. मला त्यावेळी भाषण काहीच समजले नव्हते. परंतु श्री. तात्यारावांनी बॅरिस्टर होण्यासाठी लंडनला जाण्यापासून ते स्वातंत्र्य चळवळीसाठी जे जे काही केले याशिवाय अंदमानमधील जन्मठेपेची शिक्षा त्यावर भाषण होते. जहाल मतवादी म्हणून श्री. तात्यारावांना त्यावेळी राजकीय दृष्ट्या दूरच ठेवले होते. त्यामुळे त्यांच्या नावाचा फारसा उदो उदो झाला नव्हता.

**- माननीय श्री. मा. ना. पाटील**
ज्येष्ठ कार्यकारिणी सभासद
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●

पुस्तक परिचय – १

# आई मी येऊ का? (कथासंग्रह)

– दि. र. भालेराव

लेखक दि. र. भालेराव यांचे हे पहिले वहिले पुस्तक. लेखनाची वाचनाची आवड पहिल्यापासून होती. कल्याण मुंबई लोकल प्रवासात वाचनाची आवड कशीबशी निभावता आली. पण लेखनाला वेळ मिळाला तो निवृत्तीनंतर १९३१ सालापासून. मग हळूहळू मासिकातून कथा, कविता, लेख प्रसिद्ध होऊ लागले.

'आई मी येऊ का?' हे एकूण अकरा कथांचे पुस्तक. दीपाली प्रकाशन, कल्याण यांनी प्रकाशित केलेले, 'आई मी येऊ का?' ही पहिलीच कथा मृखपृष्ठावरील चित्रावरुन परीकथा आहे की काय असे वाटते आणि कथा वाचल्यानंतर ती तशीच काल्पनिक अद्भुत स्वरूपाची वाटते. मुलीसाठी चान्स घेतलेल्या माधवीला आठव्यात भास होऊ लागतात की गर्भातून कोणीतरी विचारतंय 'आई मी येऊं का?' घरातले सगळेच हा भास आहे बाकी त्यात काही तथ्य नाही असे समजून त्याकडे दुर्लक्ष करतात. प्रसूतीच्या वेळी तिच्या पोटात जोरदार हालचाल होऊन एकदम बंद पडते. ऑपरेशन करुन मृत झालेली मुलगी बाहेर काढली जाते. माधवीला तिच्या बहिणीला जी त्या मुलीचा आर्थिक भार उचलणार असते कारण तिला मुलानंतर मुलीसाठी नोकरीमुळे दुसरा चान्स घेणे शक्य नसते म्हणून त्या सर्वांना दुःख होते. त्याचवेळी माधवीला झोपेचे इंजेक्शन दिले असता स्वप्न पडते. स्वप्नात एक सुंदर परी सदृश स्त्री जी स्वर्गात इंद्राच्या दरबारात स्त्री प्रतिनिधित्व करत असते. तिला क्षुल्लक चुकीमुळे शिक्षा होते की तू पृथ्वीवर जन्म घेशील म्हणून. ती देवांची क्षमा मागते, पाया पडते उःशाप मिळावा म्हणून. मग उःशाप मिळतो तू फक्त नऊ महिने गर्भावास भोगशील व न जन्मताच स्वर्गात परत येशील. पण गर्भात तिला मातेद्वारे मिळणारे अन्न खूप आवडू लागते व असेच पृथ्वीवर आणखी काय काय चांगले पदार्थ असतील याचे आकर्षण वाटून तिला पृथ्वीवर जन्मावेसे व सर्व सुखोपभोग घ्यावेसे वाटतात. पण आता इलाज नसतो. तिला एकदम एक सुभाषित आठवते 'जननी जन्म भूमिश्च स्वर्गादपि गरियसी' जर मातेनेच तशी इच्छा दर्शवली तर देवांनासुद्धा ती डावलता येणार नाही. म्हणून ती गर्भातून 'आई मी येऊ का?' विचारते. 'आई तू ये का म्हणाली नाहीस मला!' नाहीतर मी तुझ्या पोटी जन्मले असते. माझी खूप निराशा झाली म्हणून माझी खूप तडफड झाली स्वर्गात परत जाताना. ती तुलाही जाणवली त्यावेळी. पण नंतरची तुझी अवस्था पाहून मला खूप वाईट वाटले, पश्चाताप झाला म्हणून मी तू नऊ महिने उदरात मला वाढवलेस त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तुझ्या स्वप्नात आलेय आणि पहाता पहाता ती छबी नाहिशी झाली. माधवीला जाग आली. आता तिचा तो प्रश्न आयुष्यभर माझा पाठ पुरावा करेल.

वास्तवापेक्षा अद्भुततेकडे झुकणारी ही कथा. दुसरी कथा 'चोरावर मोर' एका सराईत पाकिटमारावर. एका सामान्य माणसाने कुरघोडी केल्याची. 'दैव जाणिले कुणी' यातील तोतरे मामा व त्यांच्या पत्नी–मामी यांची चाळीत घडणारी जीवन कहाणी शेवटी मामांची झालेली परवड यात चितारलेली आहे. 'चिनू आजोबांबरोबर बँकेत जातो' ही चुणचुणीत लहानग्या चिनूची गोष्ट आहे. 'जगावेगळा नवरा' यात विसरभोळा नवरा पेश केला आहे. 'अजून लहान आहे रे ती' यात लग्नाचा अर्थ न समजणाऱ्या वयात लग्न झालेली मुलगी दाखवली आहे. त्यामुळे नवऱ्याला धरावा लागलेला धीर, तयाची अधिरता आणि तिची अबोधता याचा संघर्ष वर्णिला आहे. 'दैवगती'मध्ये दोघांनी लग्न ठरवलेले असतांना आधी तिने निर्विकार राहणे नंतर त्याचे दुसरीशी लग्न ठरतेय कळल्यावर त्याला किडन्याप करुन स्वतःशी विवाह करायला लावणारी कथा नायिका दाखवली आहे.

सर्वच कथा गोष्ट सांगितल्यासारख्या सरळ सरळ

ज्ञान एकाकडून समजून घ्यायचे, उद्या दुसरा गुरू करायचा असे करता कामा नये.

सांगितल्या आहेत. कथेचे तंत्र लेखकाला तितकेसे साधलेले नाही. कथा वाचताना वाचकाची उत्सुकता कुठेच वाढवली जात नाही. कथा बीज छोटे असले तरी ते फुलवण्यात लेखकाचे कौशल्य दिसून पडते. ते तंत्र लेखकाने आत्मसात करायला हवे. त्यातल्या त्यात चुणचुणीत चिनू, तोतरे मामा, पाकेटमार ही पात्रे लक्षात राहतात.

''आई मी येऊ का?'' दि. र. भालेराव, दीपाली प्रकाशन, कल्याण. पुष्ठे-१११, मूल्य-१००रु.

**पुस्तक परिचय - २**

## कळाव

– लेखक : प्रकाश सोनाळकर

फुले-शाहू-आंबेडकर या विचारधारेची चळवळ संत कबीर सांस्कृतिक मंडळाच्या कबीर व्याख्यान मालेतून पुढे नेत असताना ही चळवळ लेखन रुपाने वाचकांपर्यंत पोचवावी असे मनात आल्यामुळे लेखक प्रकाश सोनाळकर यांनी 'कळाव' ही कादंबरी लिहिली. कोणत्याही किरकोळ कारणामुळे जातीय संघर्ष विकोपाला जाऊन त्यात असंख्य निष्पाप जीव बळी पडतात. आपल्या स्वार्थासाठी बहुजनांच्या पायात कळाव बांधणाऱ्या अनेक वृत्ती प्रवृत्ती मी प्रत्यक्ष पाहिल्या ऐकल्या, वाचल्या आणि मनात एक अस्वस्थतेचे वादळ निर्माण झाले नि त्यातूनच या कादंबरीचा जन्म झालाय असे लेखकाने सुरवातीस म्हटले आहे.

शारदा प्रकाशनने अतिशय देखणे असे हे पुस्तक काढले आहे. मुखपृष्ठ व मलपृष्ठ ही अर्थपूर्ण आहे. या पुस्तकाला प्रसिद्ध साहित्य समीक्षक 'मराठी साहित्य ठाव आणि उठाव' कार प्रा. राजेंद्र करनकाळ यांची प्रस्तावना आहे. पिढ्यान पिढ्या जातीय व्यवस्थेच्या जोखडात बंदिस्त झालेल्या दलितांच्या व्यथा व वेदना मांडणारी व स्वाभिमानातून परिवर्तनाच्या दिशेने झेपावणाऱ्या एका नव युवकाची, सम्राटची व त्याच्या साथीदारांची 'कळाव' ही कथा आहे. घोड्याच्या पायाला दोरखंड (कळाव) बांधून त्याला हिरवळीवर चरायला सोडले जाते. समोर हिरवळ दिसते पण पायातील कळावामुळे त्याला धड खाता येत नाही पळता येत नाही. पाय मात्र सोलून निघतात जातीयतेचे कळाव दलितांच्या पायात अडकल्यामुळे त्यांची स्थिती त्या जनावरासारखीच झालीय. सवर्णांच्या अमानुष अतयाचाराखाली दलितांचे जीवन चिरडले जात असताना बंडाचे निशाण घेऊन सम्राट हा दलित तरुण समाजाला जागृत करतो. विनाशाच्या कड्यावर गाव उभे असताना फुले आंबेडकरी विचारांची कास धरणारा सम्राट आपल्या समर्थ नेतृत्वाने गावाला वाचवतो. कळावची ग्रामीण पार्श्वभूमी, आंबेडकर जयंतीची मिरवणूक, महादेव मंदिरात दलितांनी केलेला प्रवेश गुढीपाडव्याचा उत्सव, निवडणूक, ग्रामसभा, सरपंच व बांडे पाटलांचे स्वार्थी राजकारण, दलित वस्तीवरील हल्ला या बारीक सारीक घटना, प्रसंगाचे तपशील, उपकथानके यासार्व आशयाचे पदर श्री. सोनाळकर यांनी खुमासदार शैलीत उलगडून दाखवले आहेत.

सम्राट, लिंबाजी, राहुल, राजबा, धोंडीबा, गेनूबूवा इ. पुरुष व्यक्तिरेखा 'कळाव' मध्ये ठळकपणे येतात परंतु तथा स्त्री व्यक्तिरेखा मात्र येत नाही. पुरुष व्यक्तिरेखाच्या आड त्या निस्तेज निष्प्रभ झाल्यासारख्या वाटतात. तरीपण नवसमाज निर्मितीची सुंदर स्वप्ने उराशी बाळगणाऱ्या प्रकाश सोनाळकर यांनी आंबेडकरी विचारांचे आत्मनिष्ठ भान ठेऊन समाजातील परिवर्तनवादी वास्तवाचे बारकावे, वृत्ती प्रवृत्तीचे ताण तणाव कळावमध्ये उत्कृष्टपणे रेखाटले आहेत.

लेखक म्हणतो, 'आजही प्रत्येकाला युद्धापेक्षा बुद्धच हवाहवासा वाटतो. तरीही आजच्या विज्ञानयुगात जातीय संघर्ष आपले डोके नको तेवढे वर काढतो. एक माणूस जातीय वर्चस्वासाठी दुसऱ्याला जिवंत जाळतो, छळतो हे कृत्यच अमानवीय वाटते. केरबा वाण्याच्या हॉटेलात सम्राट व राहूल चहा पिऊन हॉटेल बाटवतात. या घटनेमुळे दलित-सर्वण संघर्षाची पहिली ठिणगी पडते. त्यानंतर विहिर बाटवली म्हणून, महादेव मंदिरात प्रवेश केला म्हणून अशा प्रकारच्या

समाज व्यवस्थेतील जातीय दंगलीत होरपळणारे गाव व त्यातील धगधग पेटती ठेवण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

कळावमधून लेखकाने समाजासमोर काही प्रश्न निश्चित मांडलेले आहेत. दलित सवर्ण तंट्यातून शेवटी काय साधले जाणार? स्वार्थांधता काय साधले जाणार? स्वार्थांमद्धता समाजाला अशीच पोखरत राहणार का? यातून दलितांची सुटका कधी होणार?

कादंबरी वाचून मन अस्वस्थ होते आणि हेच या नव कादंबरीकाराचे यश आहे.

**कळाव** – प्रकाश सोनाळकर, शारदा प्रकाशन, ठाणे पृष्ठे–२४०, मुल्य–२१०रु.

**पुस्तक परिचय – ३**

## काव्यसंग्रह

ग्रंथास्वादच्या निमित्ताने आज माझ्यापुढे काही पुस्तके आहेत. महाराष्ट्रातल्या ज्येष्ठ ख्यातनाम कवयित्री प्रा. उषा लिमये या मूळच्या विदर्भातल्या नागपूरच्या. त्यांचे नुकतेच प्रकाशित झालेले तीन काव्यसंग्रह 'पांथस्थ मी पाथेयाची', 'मानवतेचा मनु जागता' आणि 'नसून मी आहे अन् असून मी नाही' हे वाचताना त्यांच्या 'विसावा'(१९५५) प्रस्तावना वि. स. खांडेकर व नंतर बऱ्याच वर्षांनी प्रसिद्ध झालेला त्यांचा 'पालखी' (२००९) या दोन्ही संग्रहातील त्यांच्या साध्या सरळ कौटुंबिक सौहार्दाच्या, स्त्रीविषयक जाणिवांच्या, समाजभानाच्या, आध्यात्मिक नेणिवेच्या उत्कृष्ट, तरल, प्रवाही, प्रसन्न शैलीतल्या अनेक कविता आठवून गेल्या. लग्नांनंतर चौदा वर्षांनी शिक्षणाला सुरुवात करुनही एम्.ए.ला फर्स्ट. त्यांची कादंबरी, नाटक, एकांकिका, कथासंग्रह, बालगीत संग्रह, गीत गजानन आदी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. काही अजूनही प्रकाशित होत आहेत. त्यापैकीच नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांचा आस्वाद घेऊ या.

''लेखणीचे बळ। शब्दाची शिकार
करात ओंकार। वसे माझ्या।।
भाव वेडे ब्रह्म। माझे आतुरते
विश्वही आत्मते। शब्दावीन।।''

'पांथस्थ मी पाथेयाची या संग्रहातील 'लेखणीचे बळ' या कवितेतील वरील ओळीतून स्वतःच्या अंतरंगात डोकावून पाहताना आत्मशोधाच्या अनुभवकणांना शब्दरुप मिळाले आहे. 'प्रश्न माझे लक्ष कोटी', 'त्याच प्रकाशाची ओढ', 'जीवनाचे श्रेय', 'देवाचे मज देवपण नको' या कविता म्हणजे आपला अंतःस्वर जपत समईच्या ज्योतीसारखा आपला मनोगाभारा शांत पावित्र्यतेने उजळत दीर्घकाळ केलेल्या काव्यसाधनेचा परिपाक आहे.

'जाणीव असती तर लाटेला
उरात फुटूनी विरावयाची
सासरास ना आस लागती
चंद्रकरांना धरावयाची।।'

'नसून मी आहे अन! असून मी नाही' या संग्रहातील 'जाणीव असती' या कवितेतील वरील ओळी तसेच 'बोच' कवितेतील पुढील ओळी –

नेतो सर्वस्व वाहून दुर्दैवाचा पाणलोट
आणि हिमाने भाजती माझे दगडाचे ओठ....

तसेच 'जीवन हे जीवन हे घाण्याचा बैल जसे पाठीवर चाबुक पण पायामधि जाण नसे' या जीवन हे या कवितेतील ओळी, नि'रितीच घागर' या कवितेतील

'निराश आसक्तीची हाती
पिचलेली कचकचे बांगडी
अहेवानही फक्त रितेपण
रितीच घागर करुण कोरडी।। या अशा ओळी ओळीतून आपल्या कवितेच्या साधेपणाच्या अंतःसौंदर्यातून रसिकाला साद घालतात, खिळवून ठेवतात, लुब्ध करतात.

माझ्या समोरचा त्यांचा तिसरा संग्रह 'मानवतेचा मनू जागता!' या संग्रहातील 'मनोगत' मधील या काव्यपंक्ती

'अंधाराची कारा येथे। मला प्रकाशाची आस
इथे सांताची शराब। मला अनंताचा ध्यास।।'
'बुद्धीवादात जाळीली। तुवा श्रद्धा भावभक्ती
मानवतेला म्हणून। आज मृत्यूमध्ये मुक्ती'

'मानवतेला म्हणून' कवितेतील या आणि अशाच सर्वच कवितांतून त्या आपल्या प्रतिभा सामर्थ्याने रसिकालाही अंतर्मुख करतात.

''माझी मोहोराची माया स्वार्थ साधीना विश्वाचा
म्हणून हा उपहास फुलवेड्या बाभुळीचा
उरी फुटतो जमेन लाख मोलाचे वात्सल्य
झाले आभाळाच्या खाली निराधार वालखिल्य''
'वालखिल्य' ही आणखी अशीच कविता.

आपल्या अंतस्थ काव्यशैलीने कवयित्रीने तिन्ही काव्यसंग्रहातून रसिकांना भरभरून दिले आहेत उर्जेचे स्त्रोत आपल्या 'विसावा' नि 'पालखी' या आधीच्या संग्रहांसारखेच.

**पुस्तक परिचय – ४**

## सागर-कादंबरी

– प्रतिभा जौहरी

'सागर' ही प्रतिभा जौहरी यांची मूळ हिंदी कादंबरी. या कादंबरीला हिंदी अकादमी, दिल्ली या संस्थेचा पुरस्कार मिळालेला आहे. प्रतिभा जौहरी यांनी अनेक कादंबऱ्या व कथा जिहिल्या आहेत तसेच त्यांना अनेक सन्मानही मिळालेले आहेत.

'सागर' ही मर्चंट नेव्हीतील एका नैतिक मूल्य जपणाऱ्या कॅप्टनची कहाणी. मनावर झालेले सुसंस्कार महासंकटांचा सागर पार करायला साह्य करतात.

या मूळ हिंदी कादंबरीचा सरस-सुबोध अनुवाद प्रख्यात प्रथितयश लेखिका डॉ. अनुपमा निरंजन उजगरे यांनी बेमालूम केला आहे की ती कादंबरी मराठीच वाटावी. त्यांची साधी सोपी ओघवती भाषा वाचकाला सागर सफरीत मुक्त विहार करायला भाग पाडते. सागर सफरीची सैर एक अनोखा अनुभव वाचकाला त्यामुळेच मिळून जातो. ही त्यांच्या लेखनाची खासियत म्हणता येईल.

(**सागर**-प्रतिभा जौहरी, अनुवाद-अनुपमा उजगरे, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे. किंमत रु.१२५/-)

**पुस्तक परिचय – ५**

## मीच माझा मोर - काव्यसंग्रह

– प्रशांत असनोर

'मीच माझा मोर' हा प्रशांत असनोर यांचा काव्यसंग्रह कांदिवलीच्या पाऊस प्रकाशनने प्रकाशित केला आहे.

लिहिता लिहिता, थोड्या वेळानं, मी सहज वर पाहतो
तर कोळ्यानं त्याची कविता, कधीच पूर्ण केलेली!
मी मात्र अजूनही, शब्दांच्या जाळ्यात अडकलेला! किंवा

आणि बघता बघता एक दिवस, तो खरंच मोर झाला!
त्यानं दाणा खाल्ला, पाणी प्यालं आणि उडून गेला भुऽऽर्र...

अशा मुक्तछंदात्मक कवितांचा हा संग्रह, आई वडिलांनी माझ्या मुठीत एक रोप ठेवलं ते वाढलं. त्याला आलेली ही काव्यफुलं आज कृतज्ञतापूर्वक तुमच्यासाठी अशी अर्पण पत्रिका आहे. स्वतःला आलेल्या अनुभवांचा मुक्त अविष्कार कवीने सहजपणे काव्यातून फुलवला आहे. नि त्यांचा मुक्त मनमोर पाऊसात सचैल चिंब चिंब झाला आहे. काव्य रसिकांनी त्या काव्यात चिंब होऊन त्याचा आस्वाद घ्यावाच एकदा.

**मीच माझा मोर** (काव्यसंग्रह) – प्रशांत असनोर, पावस प्रकाशन-कांदिवली, किं. रु. १००/-.

**– श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्‌,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी – २५४१०१४०
मोबाईल – ९३२४०४४७६४

●●●

साहित्य-जगत

# रियासतकर गोविंद सखाराम सरदेसाई यांच्या रियासती हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास

कोणत्याही देशाच्या, समाजाच्या किंवा घटनेच्या वास्तव इतिहासाचे सर्वांगीण ज्ञान होण्यासाठी संबंधित विषयाचे संशोधन करावे लागते. इतिहास लेखनाची ती प्राथमिक गरज असते. पण तेवढेही पुरेसे होत नाही. संशोधनाने हाती आलेल्या नवीन माहितीच्या आधारे इतिहास लेखन व विश्लेषण केले तरच त्या ऐतिहासिक विषयाचे आकलन होऊ शकते आणि त्याही पुढे जाऊन तत्कालीन परिस्थितीच्या योग्य प्रकाशात इतिहासाचे वास्तव स्वरूप स्पष्ट होण्यासाठी त्यावर भाषण करणेही उपयुक्त ठरते. थोडक्यात संशोधन, लेखन, विश्लेषण आणि त्यांवरील भाष्य अशा चार पद्धतींनी इतिहासाचे मंथन झाले तरच त्यांचे अंतरंग लक्षात येण्यास मदत होते.

## रियासतकार गो. स. सरदेसाई

रियासतकार गो. स. सरदेसाई (१७.५.१८६५-२९-११-१९५९) यांनी याच कार्यपद्धतीने साठ वर्षे परिश्रम करुन इ. स. १००० ते १८५८ पर्यंत सुमारे साडे आठशे वर्षांचा भारताचा इतिहास लिहिला. त्यासाठी ऐतिहासिक साधने तपासली. त्यांचे संशोधन केले. वरचेवर उपलब्ध होणाऱ्या नव्या साधनांची शहानिशा करून त्याची विश्वासार्हता वाढवली. जरुर तिथे गुंतागुंतीच्या घटनांचे विश्लेषण करुन त्या अधिक स्पष्ट केल्या आणि काही मतभेदांच्या प्रकरणांवर स्वतंत्र बुद्धीने भाष्यही केले. निष्ठापूर्वक केलेल्या अशा तपश्चर्येतून 'मराठी', 'मुसलमान आणि ब्रिटिश अशा तीनही कालखंडाचे इतिहास सिद्ध केले. त्याला त्यांनी 'रियासती' असे काहीशा निराळ्या वळणाचे नाव दिले.

सुमारे वीस वर्षांपूर्वी इतिहासकार स. मा. गर्गे यांच्या नेतृत्वाखालील संपादन समितीने या रियासतीचे पुनर्संपादन केले व मराठी रियासतीचे आठ, मुसलमानी व ब्रिटिश रियासतीचे प्रत्येकी दोन खंड पॉप्युलर प्रकाशनाने (३०१, महालक्ष्मी चेंबरर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई-४०००२६) दूरध्वनी -०२२-२३५३०३०३. प्रकाशित केले.

## रियासतकार गो. स. सरदेसाई यांचे जीवन व लेखन

गो. स. सरदेसाई इतिहासकार व इतिहास संशोधक होते. बडोद्याच्या सयाजीराव महाराजांकडे 'रीडर' म्हणून नोकरी करत. महाराजांना वर्तमान पत्रे, पत्रे, पुस्तके वाचून दाखवणे हे त्यांचे काम. पुढे युवराज फतेसिंहराव ह्यांचे टयूटर म्हणून ते काम करीत. सयाजीराव महाराजांबरोबर भारतामध्ये तसेच इंग्लंड व युरोपतही त्यांचा भरपूर प्रवास झाला. राजवाड्यातील नोकरी बरोबरच त्यांनी इतिहासाचा अभ्यास व लेखन चालूच ठेवले होते. त्यांनी १८८९ ते १९२५ अशी सुमारे ३६ वर्षे महाराजांकडे नोकरी केली. १९२५ नंतर ते पुणे-मुंबई मार्गावरील कामशेत येथे इंद्रायणी नदीच्या काठी स्थायिक झाले. वयाच्या ९४ व्या वर्षी निधन होईपर्यंत ते अखंड कार्यरत होते.

१८९८ मध्ये मुसलमानी रियासत लिहून त्यांनी हिंदुस्थानच्या अर्वाचीन इतिहासाचे काम सुरू केले ते १९३९ मध्ये ब्रिटिश रियासत लिहून पूर्ण केले. मुसलमानी रियासत २ खंड मराठी रियासत ८ खंड आणि ब्रिटिश रियासत २ खंड अशा एकूण १२ खंडांमध्ये त्यांनी हा इतिहास पूर्ण केला.

रियासती बरोबरच 'न्यू' हिस्ट्री ऑफ द मराठीज, 'मेन करंटस् ऑफ मराठी हिस्ट्री' असे दोन ग्रंथ इंग्रजीमध्ये लिहिले. पेशवे दप्तरातील निवडलेल्या कागदांचे एकूण ४५ खंड त्यांनी संपादित केले. 'माझी संसार यात्रा' हे त्यांचे आत्मचरित्र

सयाजीराव महाराजांच्या आठवणीचे एक पुस्तक, श्यामकांताची पत्रे हे आपल्या दिवंगत मुलाच्या निवडक पत्रांचे संपादित पुस्तक ही त्यांची आणखी काही उल्लेखनीय पुस्तके असे सुमारे १०५ ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत.

रावसाहेब (१९३२), रावबहादूर (१९३७), पद्मभूषण (१९५७), इतिहास मार्तंड (१९४६) या पदव्या आणि पुणे विद्यापीठाची सन्माननीय डी. लिट (१९५१) ही पदवी त्यांना मिळाली.

### रियासतींचे कालखंड

**मुसलमान रियासत :** या रियासतीच्या दोन खंडातील इतिहासाचा कालखंड इ. स. १००० पासून इ. स. १७०७ पर्यंत आहे महंमद गझनीच्या भारतावरील पहिल्या स्वारीने मुसलमानी इतिहासाचा प्रारंभ होतो आणि मोगल बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूबरोबर या इतिहासाचा शेवट होतो.

**मराठी रियासत :** मराठ्यांच्या इतिहासाला प्रेरणा देणाऱ्या अगदी आरंभ काळापासून एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या अखेरपर्यंत म्हणजे सुमारे २०० वर्षांचा इतिहास मराठी रियासतीमधून निवेदन केला आहे. (सवाई माधवरावाच्या कारकीर्दीचा शेवट २७ ऑक्टोबर १७९५ रोजी झाला आणि त्याबरोबरच इ.स.१८१८ साली मराठीशाहीचा अंत झाला. मराठेशाही उदय उत्कर्ष ऱ्हास आणि अस्ताचा हा समग्र इतिहास मराठी रियासतींच्या आठ खंडांमध्ये रियासतकारांनी वर्णन केला आहे.)

**ब्रिटिश रियासत :** या रियासतींचे दोन खंड आहेत. पहिल्या खंडात इ. स. १४९८ पोर्तुगीज दर्यावर्दी वास्को-द-गामाने भारताच्या पश्चिम किनाऱ्याला आपले व्यापारी जहाज लावले. तेव्हापासून इ.स. १९५७ मध्ये इंग्रजांनी रॉबर्ट क्लाईव्हच्या नेतृत्वाखाली प्लासीची लढाई जिंकली तोपर्यंतचा इतिहास समाविष्ट केला आहे. दुसऱ्या खंडात इ.स.१७५७ पासून १८५७ पर्यंतचा शंभर वर्षाचा इतिहास रियासतकारांनी निवेदन केलेला आहे.

### इतिहासाच्या अभ्यासात रियासतींचे महत्त्व

''रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांनी लिहिलेल्या ब्रिटिश आणि मुलसलमानी रियासतींचे संच इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. रियासतकारांनी ऐतिहासिक व्यक्तींचे केवळ मूल्यमापन न करता उपलब्ध साधनांच्या आधारे इतिहासाचे लेखन केले म्हणून या रियासती सामान्य वाचकापर्यंत पोहोचल्या'' असे उद्गार ज्येष्ठ पत्रकार आणि अभ्यासक अरुण टिकेकर यांनी पॉप्युलर प्रकाशनाच्यावतीने वरील दोन्ही रियासतींच्या लोकार्पण समारंभात (१०-९-२०१२) काढले. मराठी रियासतींच्या आठ खंडाचे पॉप्युलरने मागील वर्षी प्रकाशन केले होते. नेहमी मराठी रियासतींना खूप मागणी असल्यामुळे त्यांचे ही पुर्नमुद्रण करण्यात आले आहे.

''ज्यांच्या इतिहास लेखनामुळे कधीही वादंग झाले नाहीत अशा व्यक्तींच्या ग्रंथाचे प्रकाशन करताना आपल्याला विशेष आनंद होत आहे'' असे टिकेकर म्हणाले. इतिहास तज्ञ प्रा. जे. व्ही. नाईक इतिहासात घडलेल्या चुका बदलून इतिहास समजून घेणे आवश्यक असून त्या दृष्टीने या रियासतींचे महत्त्व मोठे आहे.''

### नव्या विक्रीकेंद्राचे उद्घाटन

पॉप्युलर प्रकाशनाचे संस्थापक ग. रा. भटकळ यांच्या ११६ व्या जयंतीनिमित्त प्रकाशनाच्या नव्या विक्रीकेंद्राचा शुभारंभ यावेळी करण्यात आला. रियासतकारांनी लिहिलेल्या या दुर्मिळ ग्रंथांचे पुर्नप्रकाशन केल्याबद्दल दोन्ही वक्त्यांनी प्रकाशकाचे कौतुक केले. पॉप्युलर प्रकाशनाचे हे हीरकमहोत्सवी वर्ष आहे. तिन्ही रियासतींच्या १२ खंडांची एकूण किंमत ८३००/- रु. आहे. अधिक माहितीसाठी ०२२-२३५२३०५२ या नंबरवर संपर्क साधावा.

### पॉप्युलर मित्रमंडळ व 'प्रिय रसिक' मासिक पत्रिका

मराठी आणि इंग्रजी साहित्यातील अनेक नामवंत

साहित्यिकांची पुस्तके विशेष सवलतीत मिळविण्यासाठी वाचकांनी पॉप्युलर मित्रमंडळाचे सभासद व्हावे. सभासदतवाची वार्षिक वर्गणी केवळ रु.१००/- आहे. पॉप्युलर मित्रमंडळ सभासदांना 'प्रिय रसिक' ही मासिक पत्रिका दरमहा पाठविली जाईल/जाते.

### ग्रंथालयांनी या रियासती अवश्य संग्रही ठेवाव्या

महाराष्ट्रातल्या व इतर राज्यातील ग्रंथालयांनी व इतिहासाच्या अभ्यासकांनी या बहुमोल रियासती आपल्या संग्रही अवश्य ठेवाव्यात ही नम्र विनंती. वाचकांची व अभ्यासकांची ती मोठी सोय होईल.

पॉप्युलर प्रकाशनाचे मनःपूर्वक अभिनंदन!

### साधना 'साप्ताहिकाचा पुनर्भेट' विशेषांक

साधना साप्ताहिकाच्या (९६२, सदाशिव पेठ, बॅ. गाडगीळ रस्ता, पुणे-४११०३०; फोन नं. ०२०-२४४५१७२४; वा. व. रु.५००/-, संस्थांसाठी रु.६००/- - हीरक महोत्सावानिमित्त ५९ वर्षांतील निवडक लेखांचा समावेश असलेला आठ खंडांचा 'निवडक साधना ग्रंथ २००७' मध्ये प्रकाशित झाला होता. त्यानंतरच्या पाच वर्षात म्हणजे २००७ ते २०११ या काळात साधनाचे २५० अंक प्रकाशित झाले. त्यातून ७५०० पानांचा मजकूर दिला गेला. त्यात प्रत्येकी दोन पानांचे जवळपास ८०० लेख आहेत आणि लहान मोठी अशी १०० पेक्षा अधिक वाचकपत्रे आहेत. त्यापैकी २५ लेख आणि १० वाचकमित्र आहेत. त्यापैकी २५ लेख आणि १० वाचकमत्रे या 'पुनर्भेट विशेषांकात' (पृ.७४, मूल्य ३०; हा अंक ६५ व्या वर्षाचा अंक १ व २ - १८ व २५ ऑगस्ट २०१२) आहेत. हा अंक वाचनीय व संग्राह्य आहे. त्यामध्ये राजकीय, सामाजिक साहित्य, संस्कृती विषयक अत्यंत महत्त्वाचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतील काही लेखकांची नावे व लेखकांची शीर्षके अशी आहेत- अरुण टिकेकर ('साधुमुखे समाधान'), अभय टिळक (दाहक, अप्रिय, तरीही अटळ), विनोद शिरसाट (ज्योती बसूंना प्रतप्रधान होऊ न देणे ही 'माकप' ची ऐतिहासिक चूक आहे?), संपादक नरेंद्र दाभोळकर ('वारीचे सामर्थ्य समता संगराला लाभावे!') रेणू गावस्कर (संकटांशी सामना करताना), अवधूत परळकर (दिनकर गांगल यांना अनावृत्त 'पत्र'), रा. ग. जाधव (विजय तेंडुलकर एक शिवधनुष्य म्हणून उरणार).

### साधना प्रकाशनाची निवडक प्रकाशने

२१५०/- रु.चा १२ पुस्तकांचा संच फक्त १३००/- रुपयांत (टपालखर्च रु. २००/- वेगळा) ही सवलत योजना फक्त पहिल्या १०० संचांसाठी आहे. ही १२ पुस्तके अशी :-

- **वैचारिक व्यासपीठे** : गोविंद तळवलकर, पृ.२१०, मूल्य रु. २००/-
- **नक्षलवादाचे आव्हान** : देवेंद्र गावडे, पृ.२४४, मूल्य रु.२००/-
- **तारांगण** : सुरेश द्वादशीवार, पृ.२२०, मूल्य रु.२००/-
- **मन्वंतर** : सुरेश द्वादशीवार, पृ.१३६, मूल्य रु.१००/-
- **शाळाभेट** : नामदेव माळी, पृ.१४०, मूल्य रु.१००/-
- **नोकरशाहीचे रंग** : ज्ञानेश्वर मुळे, पृ.२५६, मूल्य रु.२५०/-
- **बखर-भारतीय प्रशासनाची** : लक्ष्मीकांत देशमुख, पृ.३०४, मूल्य रु.२५०/-
- **कैफियत** : राजन गवस, पृ.१५२, मूल्य रु.१५०/-
- **न पेटलेले दिवे** : राजा शिरगुप्पे, पृ.१२८, मूल्य रू. १००/-

- **शोधयात्रा** : राजा शिरगुप्पे, पृ.१३५, मूल्य रू. १००/-
- **झपाटलेपण ते जाणतेपण** : संपादन नरेंद्र दाभोलकर व विनोद शिरसाठ, पृ.२५६, मूल्य रू. २५०/-
- **भारताचे शेजारी** : संपादक मनीषा टिकेकर, पृ.२७०, मूल्य रु.२५०/-

**ही पुस्तके मिळण्यासाठी संपर्क पत्ता** :

साधना मिडिया सेंटर, ४३१, शनिवार पेठ, पुणे-४११०३०; फोन ०२०-२४४५९६३५
sadhana-prakashan@gmail.com
साधना प्रकाशनाची पुस्तके flip kart.com वरुनही खरेदी करता येतील.

१५ ऑगस्ट २००६ हा साधनाचा वर्धापन दिन. त्यानिमित्त 'विहंगमालोकन विशेषांक' म्हणून प्रकाशित केला होता. साधना साप्ताहिकाच्या हीरक महोत्सवानिमित्त सुरु केलेला कार्यक्रम व उपक्रम ही अमृत महोत्सावांची पायाभरणी आहे. साधना प्रकाशनाचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा !

**- श्री. शरद जोशी (ग्रंथ प्रसारक)**
५, अमर कल्पतरू सोसायटी,
देवी चौक, शास्त्रीनगर,
डोंबिवली - ४२१२०२
दूरध्वनी : ९५२५१२-४८६९६७

●●●

## *विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर*



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस, अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा,
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं, एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस,
मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी,
माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये,
एवढीच माझी इच्छा.

**गुरुदेव रवींद्रनाथ ठाकूर**

# मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर

*गुरुदेव रविन्द्रनाथ टागोरांच्या प्रार्थनांची ही भाषांतरे मूळ कवितेतील नजाकत भाषांतर शैलीतून कशी उतरली आहे ते आवर्जून पाहण्यासारखे आहे. – संपादक*

*5*

*I ask for a moment's indulgence to sit by thy side.*
*the works that I have in hand I will finish afterwards.*
*Away from the sight of thy face*
*my heart knows no rest nor respite,*
*and my work becomes an endless toil*
*in a shoreless sea of toil.*
*To-day the summer has come at my window*
*with its sighs and murmurs;*
*and the bees are plying their minstrelsy*
*at the court of the flowering grove.*
*Now it is time to sit quiet'*
*face to face with thee, and to sing dedication of life*
*in this slient and overflowing leisure.*
*- Gurudev Ravindranath Tagor*

*मागतो मी उसंत एका क्षणाची विसावण्याजवळीं तुझ्या*
*त्यानंतर करीन पुरी सारीच कामे हातांत जी आहेत माझ्या*
*दूर दूर तुझ्या मुखदर्शनापासूनी ना विश्राम ना उसासा*
*जाणवे मम हृदया अन काम होई नित कष्टमय तट नसलेल्या सागरापरी*
*ग्रीष्म पातला घेवूनी उसासे अन् कुरबुरी मम दारावरी*
*अन घोंघावती मधुमक्षिका सुमन वाटिकेंत दरबारी*
*समय वाटे जाहला शांतीत बसण्या तुझ्या समोरी सवडींत*
*गात गीते अन् अर्पण करण्या हे जीवन तुला निरवतेंत*
***– असीम***

राजा आणि प्रजा यांच्यात संवाद राहिला नाही की देश आराजकाकडे वाटचाल करू लागतो.

6

*Pluck this little flower and take it] delay not!*
*I fear lest it droop and drop into the dust.*
*It may not find a place in thy garland, but*
*honour it with a touch of pain fromk thy hand*
*and pluck it. I fear lest the day end before I am aware,*
*and the time of offering go by.*
*Though its colour be not deep and*
*its smell be faint, use this flower in thy service*
*and pluck it while there is time.*

*- Gurudev Ravindranath Tagor*

*नकोच रे उशीर आता घे खुडूनी ते इवलेसे फूल!*
*भीत आहे मी की टाकील मान अन पडेल त्या धूळीत*

*मग कोठली जागा त्यास सजायाची तुझ्या माळेतूनी?*
*सत्वर करी त्या सन्मानीत खुडूनी तुझ्या दर्दभऱ्या स्पर्शाने*
*भीत आहे मी की अन्यथा सरेल हा दिन मला उगमण्याआधी*
*अन् सरेल वेळ पुष्पमाला समर्पणाची, छाया पडेल रजनीची*

*नसेल नसेना का रंग आकर्षक त्या सुमनाचा*
*असेल असेना का गंध मंद मंदच त्याचा काहिसा*
*गोडच मानुनी घे त्याची सेवा खुडूनी वेळ असे तोवर.*

*- असीम*

शरीर व मनाचा संभाळ नीट केला की परमेश्वराचं दर्शन होईल.

# 'दिशा' सूची २०१२

| क्र. | लेखक | लेखाचे शीर्षक | महिना | व/अंक | पृ. |
|---|---|---|---|---|---|
| १. | | १. डॉ. आगरकर यांना संजीवराय सर्मा पुरस्कार. | एप्रि. | १३/४ | १६–१८ |
| २. | अष्टेकर, गार्गी | १. सावरकरांची काव्य व नाटके | जुलै | १३/७ | २७–३१ |
| ३. | असीम | १. मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथा टागोर. | मे | १३/५ | १८ |
| | | २. – '' – | जून | १३/६ | २३ |
| | | ३. – '' – | जुलै | १३/७ | २०–२१ |
| | | ४.– '' – | ऑक्टो. | १३/१० | ११–१२ |
| ४. | आगरकर, सुधाकर | १. अंदमानची अविस्मरणीय सहल | फेब्रु. | १३/२ | ३–८ |
| | | २. आंतरराष्ट्रीय बाल विज्ञान–गणित मेळावा | डिसें. | १३/१२ | १८–२१ |
| | | ३. केंब्रिज विद्यापीठ परिसरातून फेरफटका | ऑग. | १३/८ | ३–८ |
| | | ४. केंब्रिजच्या फिट्झविल्यम संग्रहालयाला भेट | नोव्हे. | १३/११ | ३–८ |
| | | ५. केंब्रिजच्या सिडवीक संग्रहालयाला भेट | सप्टें. | १३/९ | ८–११ |
| | | ६. बसच्या टपावरुन केंब्रिजचे दर्शन | जुलै | १३/७ | ३–७ |
| | | ७. शिलामुरेन गवताळ प्रदेशातून फेरफटका | मार्च | १३/३ | ९–११ |
| | | ८. होहोट शहारातील डाझो मंदिराला भेट | जाने. | १३/१ | ३–५ |
| | | ९. होहोटमधील पंचपगोड्याला भेट | जून | १३/६ | १३–१४ |
| ५. | आठल्ये, श्रीनिवास | १. उल्लेख निर्देशः अर्थ व संकल्पना | जुलै | १३/७ | ८–११ |
| | | २. बौद्धिक संपदा, पेटंट आणि पारंपरिक ज्ञान अंकीय ग्रंथालय | ऑग. | १३/८ | ९–१२ |
| ६. | एंगडे, सुभाष | १. बुद्धाच्या शिकवणुकीचे संचित धम्मपद | मे. | १३/५ | १५–१७ |
| ७. | गराटे, सचिन | १. दिशा सूची –२०११ | फेब्रु. | १३/२ | २२–२६ |
| ८. | घुगरे, सविता | १. कवितेच्या गावा जावे... | मार्च | १३/३ | १७–२० |
| | | २. संघर्ष हेच जीवन, आत्महत्या नव्हे | जून | १३/६ | १५–१६ |
| ९. | जोशी, आदित्य | १. माझी जन्मठेप | जून | १३/६ | ३–५ |
| | | २. माझी जन्मठेप | ऑग. | १३/८ | २३–२७ |

केवळ जमीन मालकीची असली म्हणजे शेतकरी होता येत नाही, शेत कसण्याचं ज्ञान हवं.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १०. | जोशी, शरद | १. साहित्य-जगत | जाने. | १३/१ | १९-२० |
| | | २. -''- | जुलै | १३/७ | २२-२३ |
| | | ३. खबरबात पुस्तकांची | डिसें. | १३/१२ | १२-१६ |
| ११. | नाईक, पुजा | १. रेनडियर (कविता) | सप्टें. | १३/९ | ३८ |
| १२. | नाडकर्णी, नरेंद्र | १. २१ व्या शतकात श्री अरविंद विचारांची समर्पकता | मार्च | १३/३ | २७-३१ |
| | | २. अग्नी आणि सोम. | जून | १३/६ | ८-१२ |
| | | ३. अटलांटातील दिवाळी | मे | १३/५ | ३-८ |
| | | ४. महायोगी श्री अरविंदांची समाजशास्त्रीय विचारधारा (लेखांक १) | ऑग. | १३/८ | १८-२२ |
| | | ५. -''- (लेखांक २) | सप्टें. | १३/९ | १२-१५ |
| | | ६. -''- (लेखांक ३) | ऑक्टो. | १३/१० | ३-६ |
| | | ७. -''- (लेखांक ४) | डिसें. | १३/१२ | ६-११ |
| | | ८. श्री स्वामी समर्थ केंद्र, पिंपळभाट, अलिबाग | जुलै | १३/७ | २४-२६ |
| १३. | नीलकण्ठसुत | १. कृष्णाष्टकम् | जाने. | १३/१ | १६-१८ |
| | | २. शिवमानसपूजा | एप्रि. | १३/४ | १५ |
| १४. | नेर्लेकर, श्रीकान्त | १. जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी दत्ताजी ताम्हाणे | एप्रि. | १३/४ | २८-३० |
| १५. | पाटणकर, निनाद | १. माझी जन्मठेप | मार्च | १३/३ | ३-८ |
| १६. | पाटील, मा. ना. | १. फिल्ड मार्शल जनरल के. एम्. करिअप्पा | डिसें. | १३/१२ | ३-५ |
| | | २. मला भेटलेला एक विक्षिप्त टी.सी. | फेब्रु. | १३/२ | १६-१७ |
| | | ३. संत गाडगे महाराजांच्या सान्निध्यात काही काळ – एक आठवण | जाने. | १३/१ | ८-९ |
| १७. | पाठक, अविनाश | १. पंचीकरणम् | नोव्हें. | १३/११ | ९-११ |
| १८. | पाठक, मोहन | १. अर्धा राहिलेला संग्रहात कुठेतरी सापडलेला लेख | मार्च | १३/३ | ३२-३३ |
| | | २. तयाचा वेलु गेला गगनावरी | जून | १३/६ | ६-८ |
| | | ३. डॉ. मोरेश्वर दिनकर पराडकर | एप्रि. | १३/४ | २५-२७ |
| | | ४. प्रगत अध्ययन केंद्राचा अभ्यासक्रम व माहिती | ऑग. | १३/८ | ३९-४० |
| १९. | पित्रे, सुरेश र. | १. पाणी म्हणजे जीवन (कविता) | मार्च | १३/३ | ३८ |

निंदा स्तुती समान मानून वृक्ष सावली देतात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २०. | फडके, विद्या व. | १. महत्त्व वाचन संस्कृतीचे | एप्रि. | १३/४ | १२–१४ |
| २१. | बेडेकर, महेश | १. पुन्हा भ्रष्टाचार | फेब्रु. | १३/२ | ३७–३८ |
| २२. | बेडेकर, विजय | १. रामरक्षा | सप्टें. | १३/९ | ३–७ |
| २३. | मठ, शं.बा. | १. दुर्गा उपासना | ऑक्टो. | १३/१० | १३–२० |
| | | २. बृहदारण्यक उपनिषद | नोव्हे. | १३/११ | १७–२३ |
| | | ३. यज्ञ मीमांसा | डिसें. | १३/१२ | २२–२७ |
| | | ४. स्वामी रामतीर्थ (लेख पहिला) | जाने. | १३/१ | १०–१३ |
| | | ५. स्वामी रामतीर्थ (लेख दुसरा) महाविद्यालयीन शिक्षण. | फेब्रु. | १३/२ | १७–२१ |
| | | ६. स्वामी रामतीर्थ (लेखांक ३) | मार्च | १३/३ | १२–१६ |
| | | ७. – ''– (लेखांक ४) | एप्रि. | १३/४ | ७–११ |
| | | ८. – ''– (लेखांक ५) | मे | १३/५ | ९–१४ |
| | | ९. – ''– (परिशिष्ट–१) | जून | १३/६ | १७–२१ |
| | | १०. – ''– (परिशिष्ट–२) उत्कर्षाचे साधन | जुलै | १३/७ | १६–१९ |
| | | ११. स्वामी विवेकानंद (लेखांक–२) | सप्टें. | १३/९ | २१–२५ |
| | | १२. स्वामी विवेकानंदांनी आपल्या विविध भाषणातून व्यक्त केलेले विचार (लेखांक १) | ऑग. | १३/८ | १३–१७ |
| २४. | मुजुमदार, सी. श्री. | १. बालकांड | जुलै | १३/७ | ३२–३४ |
| | | २. श्री रामचरित मानस | सप्टें. | १३/९ | १६–२० |
| | | ३. –''– | ऑक्टो. | १३/१० | ७–१० |
| | | ४. –''– | नोव्हे. | १३/११ | २९–३३ |
| | | ५. –''– : एक अमृतअनुभव | मे | १३/५ | २२–२४ |
| २५. | माने, यशवंत | १. भक्तीचे प्रकार | जाने. | १३/१ | ३०–३१ |
| २६. | राणे, अंकूर | १. स्वातंत्र्यवीर सावरकरांची सहा सोनेरी पाने | एप्रि. | १३/४ | ३–६ |
| २७. | राणे, प्राजक्ता | १. माहितीचा अधिकार | जून | १३/६ | २४–२५ |
| २८. | शिंगाडे, चंद्रकांत | १. नवीन मराठी सायबर म्हणी | जून | १३/६ | २२ |
| २९. | स्नेहांकित | १. माधवराव गोखले – मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष | जाने. | १३/१ | ६–७ |

परमेश्वरापासून दूर ठेवते ती दुर्बुद्धी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३०. | साने, यशवंत | १. भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | जाने. | १३/१ | २१–२९ |
| | | २. – ’’ – | फेब्रु. | १३/२ | ९–१५ |
| | | ३. – ’’ – | मार्च | १३/३ | २१–२६ |
| | | ४. – ’’ – | एप्रि. | १३/४ | १९–२४ |
| | | ५. – ’’ – | मे | १३/५ | २५–३० |
| | | ६. – ’’ – | जून | १३/६ | २६–३२ |
| | | ७. – ’’ – (उत्तरार्ध) | जुलै | १३/७ | १२–१५ |
| | | ८. – ’’ – | ऑग. | १३/८ | २८–३४ |
| | | (मुळाक्षरे देवत्वाची – भाग २ परिक्षण) | | | |
| | | ९. भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | सप्टें. | १३/९ | २६–३२ |
| | | १०. – ’’ – | ऑक्टो. | १३/१० | २१–२७ |
| | | ११. – ’’ – | नोव्हे. | १३/११ | २४–२८ |
| | | १२. – ’’ – | डिसें. | १३/१२ | २८–३४ |
| ३१. | सोहोनी, प्रणाली | १. डॉ. सौ. मानसी देशमुख यांची मुलाखत | जून | १३/६ | ३३–३४ |

**तक्ता क्र. १ – संपादकीय**

| महिना | वर्ष/अंक | संपादकीय |
|---|---|---|
| जानेवारी | १३/१ | भयावह प्रश्नांचे शतक |
| फेब्रुवारी | १३/२ | विज्ञान समाजभिमुख हवे |
| मार्च | १३/३ | नियतिराखता |
| एप्रिल | १३/४ | आई तुझी आठवण... |
| मे | १३/५ | भारतीय चित्रपटाची १०० वर्षे |
| जून | १३/६ | ऑलिम्पिकच्या चुलीत चर्चेची लाकडे |
| जुलै | १३/७ | रात्र येते अंधारुनि... |
| ऑगस्ट | १३/८ | दहशतवाद |
| सप्टेंबर | १३/९ | अभिव्यक्ती स्वातंत्र्य |
| ऑक्टोबर | १३/१० | माहितीची उपलब्धता व तिचे परिणाम |
| नोव्हेंबर | १३/११ | शिक्षा–गुंतागुंतीचा विषय |
| डिसेंबर | १३/१२ | दैवतीकरण–नाजुक विषय |

**तक्ता क्र. २ – परिसरवार्ता**

| महिना | वर्ष/अंक | पृष्ठ |
|---|---|---|
| जानेवारी | १३/१ | ३२–३८ |
| फेब्रुवारी | १३/२ | २७–३६ |
| मार्च | १३/३ | ३४–३५ |
| एप्रिल | १३/४ | ३३–३८ |
| मे | १३/५ | ३१–४० |
| जून | १३/६ | ३५–३९ |
| जुलै | १३/७ | ३५–३८ |
| ऑगस्ट | १३/८ | ३५–३८ |
| सप्टेंबर | १३/९ | ३३ |
| ऑक्टोबर | १३/१० | २८–३८ |
| नोव्हेंबर | १३/११ | ३४–४० |
| डिसेंबर | १३/१२ | ३५–३८ |

शरीराच्या एका पेशीत सारं विश्व समावलेलं आहे.

**तक्ता क्र. – ३ पुस्तक परिचय**

| क्र. | मूळ ग्रंथ | लेखक | प्रकाशक | परीक्षणकर्ता | परीक्षणाचे शीर्षक | महिना | पृ. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कट्टा | क्षितिज कुलकर्णी | शारदा प्रकाशन, | आशा भिडे | कट्टा | नोव्हे. | १२–१३ |
| २ | गुरुवर्य वा.ल. कुलकर्णी स्मृतिग्रंथ | शिल्पा तेंडुलकर (संपा.) | चांदवेत प्रकाशन, ठाणे, २०१२ | शरद जोशी | गुरुवर्य वा.ल. कुलकर्णी स्मृतिग्रंथ | जुलै | २२–२३ |
| ३ | ग्रंथ वर्गीकरण तात्विक | श्रीनिवास आठल्ये | मुग्धा प्रकाशन, डोंबिवली,२०११ | स्नेहांकित | ग्रंथालयाच्या वर्गीकरणाची तात्विक बाजू स्पष्ट करणारे पुस्तक | जाने. | १४–१५ |
| ४ | नांगरल्याविण भुई | नंदा खरे | ग्रंथाली प्रकाशन, मुंबई | आशा भिडे | नांगरल्याविण भुई (कादंबरी) | नोव्हे. | १४–१७ |
| ५ | सांगीतिक कान, मोजमाप आणि सुधारणा | गो. का. केतकर | ऐश्वर्या प्रकाशन, डोंबिवली | शरद जोशी | सांगीतिक कान, मोजमाप आणि सुधारणा | जाने. | १९–२० |
| ६ | सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी | प्र. सी. मराठे | केशव भिकजी ढवळे प्रकाशन, मुंबई २०१२ | मोहन पाठक | श्रीमत् सुबोध अनुष्टुम ज्ञानेश्वरी : मूल संहिता व गद्य निरुपणासहित | डिसें. | १७ |
| ७ | सुबोध अनुष्टुप ज्ञानेश्वरी | प्र. सी. मराठे | –''– | शरद जोशी | साहित्य जगत | जाने. | २० |

सूची संकलन

**– श्री. सचिन गराटे**

रूपारेल महाविद्यालय, ग्रंथालय विभाग मुंबई

●●●

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

# पूर्व प्राथमिक - ए. के. जोशीचे वार्षिक स्नेहसंमेलन २०१२

दिवाळीची सुट्टी संपवून शाळा सुरू झाली की वार्षिक स्नेहसंमेलनाचे वारे वाहू लागतात. कुठले गाणे निवडायचे, मुलांना सहज जमतील अशा प्रकारच्या अ‍ॅक्शनस् शिकवून त्यांच्याकडून करून घेणे हे सर्व त्यात आले. त्यातून आमची मुले फारच लहान असल्याने आम्हा पूर्व प्राथमिक विभागातील शिक्षकांना फारच काळजी घ्यावी लागते.

या वर्षी शिक्षकांना फक्त १० दिवसांचा अवधी मिळाला. या एवढ्या कमी वेळात या लहानग्यांचे नृत्य बसवणे खरंच जिकरीचे होते. या काळात अनेक गमती घडतात. अनेकदा न सांगता मुलं गैरहजर रहातात. शाळेत येतात, पण काही कारणाने नृत्य करण्याच्या मनःस्थितीत नसतात अशा एक ना अनेक अडथळ्यांना पार करत आम्ही सर्वच शिक्षकांनी मुलांचे कार्यक्रम बसवण्याचा सफल प्रयत्न केला.

१७ डिसें. १२ रोजी उच्च माध्यमिक व माध्यमिक विभागाचे तर १८ डिसें. रोजी प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंमेलन झाले. १९ डिसेंबर रोजी पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन होते. मुलांना रंगमंच (Stage) म्हणजे काय, आपण नक्की कुठे नृत्य करायचे ह्यासाठी त्यांची रंगीत तालीम घेण्यात आली.

१९ डिसेंबरचा दिवस उजाडला. विविध कार्यक्रमांची यादी असलेला फलक दरवाजाजवळ लावण्यात आला. शिक्षकांनी सांगितलेल्या व कार्यक्रमाला साजेशा अशा वेशभूषा करुन आमची चिमणी पाखरं शाळेत आली. आपला कार्यक्रम छान होईल अशी खात्री जरी शिक्षकांना असली, तरी प्रत्येकीच्या मनात काहीशी भीती होती.

मुलांच्या पालकांनी, आजी आजोबा इतर जवळच्या नातेवाईकांनी प्रेक्षक म्हणून चांगलीच गर्दी केली होती. पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी प्रास्ताविक केले. तसेच वर्षभराचा आढावा देणारा अहवाल सादर केला.

आमच्या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे अगदी स्वागताच्या भाषणापासून दोन कार्यक्रमांतील निवेदन तसेच आभाराच्या चार शब्दांपर्यंत सर्व आमची चिमुरडी मुले मोठ्या धीटपणाने करतात. याबद्दल सर्व पालक फारच खूष असतात.

या वर्षी एकंदर १२ कार्यक्रम होते. कार्यक्रमाची सुरुवात कोकणातील पारंपारिक गणेश वंदना म्हणजे 'गणा धाव रे' या गाण्याने झाली. आमचे छोटे बाल्या गडी धमाल नाचले आणि प्रेक्षकांची दाद मिळवून गेले.

दुसरे आमच्या छोट्यांचे एक नाटुकले होते. 'चिलूची गोष्ट'. ही एका खारुताई व तिच्या पिलाची गोष्ट आमच्या ज्यूनियर के. जी. च्या मुलांनी सुंदररित्या सादर केली. त्यांचे संवाद म्हणण्याची प्रेक्षकांसमोर बिनधास्त उभे रहाण्याची ही कला बघून सर्वच थक्क झाले. शिक्षकांनी सांगितले, माईक समोर उभे राहून बोलायचे या सूचनेचे तंतोतंत पालन मुलांनी केले.

नंतर विविध रंगांची ओळख करुन देणारे गाणे, पांढ्या रंगाच्या ड्रेसवर विविध रंगांची चित्रे लावून मुलांनी छान नाच केला. लहान मुलांचा आवडता कृष्णबाप्पा त्याच्या लहानपणीच्या खोड्या, त्याचे मित्रमैत्रिणी गाई वासरं यासर्वांचे वर्णन करणारे गाणे व त्यावरचे नृत्य यानंतर सादर झाले.

---

निसर्गाच्या अजब किमयेने मनुष्य प्रभावित होतो.

तिरंगा झेंडा त्याचे रक्षण करणारे सैनिक यांच्यासंदर्भातील 'उठा राष्ट्रवीर हो' हे गीत व त्यावर आमचे चिमुकले सैनिक ऐटीत नृत्य करत होते. यानंतर एका इंग्रजी गाण्यावर चकचकीत कपडे घातलेली आमची मुलं फारच आर्कषक वाटत होती. त्या संगीतावर चांगलाच ठेका धरून मुलांनी उत्तम नृत्य सादर केले.

आपली मुंबई, ठाणे परिसराला लाभलेल्या सागर किनारी रहाणारे कोळी बांधव, त्यांची वेशभूषा करुन 'मी हाय कोली' म्हणत आमचे ज्यूनियर कोळी फारच सुंदर दिसत होते. प्रेक्षकांनीसुद्धा मुलांना तालावर ठेका धरुन प्रतिसाद दिला. लहान मुलांना आवडणारा पाऊस, त्यात मनसोक्त भिजणे वगैरे याचं पावसात चिंब भिजून 'चक धुम धुम' या गाण्यावर मुलांनी छान नाच केला.

आपल्या ठाणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी जमातीचे लोक रहातात. पारंपरिक वाद्यातून निर्माण होणाऱ्या तालावर ठेका धरत बहारदार नाचतात. आमुचे चिमुकले आदिवासी 'आम्ही ठाकरं ठाकरं' म्हणत प्रेक्षकांची उत्तम दाद मिळवून गेले. लहान मुलं म्हणजे देवाघरची फुलं. अगदी खरं आहे ते याच निरागस मुलांनी 'मैने कहाँ फुलोंसे' या गाण्यावर हसऱ्या चेहऱ्यांनी छानच नृत्य सादर केले.

भारतात अनेक प्रांत, अनेक प्रकारची नृत्ये यापैकी एक पंजाबचा भांगडा. आमचे हट्टे, कट्टे पंजाबी आकर्षक वेशभूषेत आले आणि असे काही नाचले की प्रत्येकालाच मनापासून दाद द्यावीच लागली. आता सर्वात शेवटचा कार्यक्रम 'रासलीला'. राधा-कृष्णावर असलेल्या गाण्यांतील निवडक गाण्यांवर आमचे राधाकृष्ण ठेक्यात नाचले.

यानंतर सिनीयर के.जी.च्या एका मुलीने आभार प्रदर्शन केले व कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम संपल्यावर अनेक पालकांनी तो आवडल्याची प्रतिक्रिया आर्वजून दिली. यावर्षीचे स्नेहसंमेलन यशस्वी झाल्याचा मुलांनी चांगले नृत्य केल्याचा, दहा दिवस केलेल्या मेहनतीचे चीज झाल्याचा आनंद व समाधान आम्हां सर्वच शिक्षकांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

**– सौ. प्रिती कुलकर्णी**
सौ. ए. के. जोशी स्कूल
पूर्व प्राथमिक विभाग.

●●●

## कोकण इतिहास पत्रिका

ठाण्यातील कोकण इतिहास परिषदेने कोकण इतिहास पत्रिका हे त्रैमासिक चालू केले असून त्याचा पहिला अंक नोव्हेंबर २०१२ मध्ये निघाला. मो. ह. विद्यालयातील निवृत्त शिक्षक व या विषयातील तज्ज्ञ डॉ. अरुण जोशी याचे संपादक आहेत.

पहिल्या अंकात एकूण १९ लेख असून कोकण इतिहास परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनात विभागीय अध्यक्षांनी केलेल्या भाषणांचा समावेश आहे. शिलाहाराचा ताम्रपट, लोंझा दुर्गा आणि लेणी, मरोळची कोंदिवटा लेणी जगन्नाथ शंकर शेट, वस्तुसंग्राहलय एक नवीन ज्ञान शाखा आदी लेख या अंकात आहेत.

सभासदत्व वार्षिक वर्गणी रु. १२०/- आहे.

●●●

सुखाच्या मागे लागण्याने समाधानाऐवजी असमाधानच वाट्याला येतं.

# परिसर वार्ता

**– संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

• 'छत्रपती शाहू महाराज' सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा. शनिवार दि. ८/९/१२ रोजी इ. ५ वी ते १० वी ६०० विद्यार्थ्यांचा सहभाग.

• 'Procter & Gamble' कंपनीतर्फे 'वयात येताना' या विषयावर इ. ६ वी, ७ वी च्या विद्यार्थीनींना प्रोजेक्टरवर माहितीपट दाखवला.(दि. ७/८/१२)

• इ. ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांना 'सेनानी साने गुरुजी' हा चित्रपट दाखविण्यात आला. (दि.११/९/१२)

• सम्यक संस्था, पुणे या संस्थेचे मुख्य प्रवर्तक श्री. आनंद पवार यांनी दि. १७ ऑक्टो.२०१२ रोजी 'बाप्पांची शाळा' या कार्यक्रमांतर्गत इ. ९ वी च्या पालकांना मार्गदर्शन केले. विषय – १३ ते १७ वयोगटातील मुलांमध्ये होणारे शारिरीक व मानसिक बदल व वर्तन.

• गाईड कॅप्टन सौ. कल्पना बोरवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली इ. ८ वी व ९ वीतील सहा गाईड्सची राज्य पुरस्कारासाठी निवड झाली.

• दि. १४ व १५ डिसे.२०१२ रोजी ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांचा वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. विनोद जमधाडे व श्री. अविनाश कोरडे उपस्थित होते.

• डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षांतर्गत सप्टेंबर २०१२ मध्ये झालेल्या लेखी परीक्षेत इ. ९ वी तील दोन विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रासाठी निवड झाली.

• भारतीय दलित साहित्य अकादमी, दिल्ली यांच्यातर्फे दिला जाणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप राष्ट्रीय सन्मान पुरस्कार शाळेचे मुख्याध्यापक श्री. ज. रा. गवई यांना प्रदान करण्यात आला. (दि. १०/१२/२०१२)

• 'स्व. सुरेश पेंढारे चॅरिटेबल ट्रस्ट' आयोजित खोपट महोत्सव – २०१२ मध्ये इ. ७ वी ड मधील 'मंगळागौर' या समूह नृत्याला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

• 'महाराष्ट्र पोलीस रेझिंग डे' निमित्त ठाणे पोलीस आयुक्तालय आयोजित 'लढा बदल त्या सामाजिक गुन्ह्यांशी' या परिसंवादास सौ. करंडे–जोशी व सौ. ताणळे, निवडक विद्यार्थ्यांसह उपस्थित होते. (दि.२/१/२०१३)

• वाहतुक नियंत्रण शाखा, ठाणे आयोजित 'रस्ता सुरक्षा अभियान–२०१३' मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमात ७ वी अ च्या 'जय हो' समूह नृत्यास तृतीय पारितोषिक मिळाले. त्यांचा सिने अभिनेता अमिताभ बच्चन यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

## बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**शिक्षकांचे यश**

• डॉ. माधुरी किरण पेजावर, प्राचार्या आणि विभागप्रमुख प्राणिशास्त्र विभाग, बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय ठाणे व विज्ञान विभाग अधिष्ठाता, मुंबई



**जनकवी पी. सावळाराम पुरस्कार २०१३ चे मानकरी**

विद्यापीठ यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील भरीव कामगिरीबद्दल **जनकवी पी. सावळाराम** पुरस्काराने दि. २३ डिसेंबर २०१२ रोजी सन्मानित करण्यात आले.

आजवर त्यांचे ५० संशोधनपर लेख राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधून प्रसिद्ध झाले आहेत. पर्यावरण विषयक ३ संशोधन प्रकल्प त्यांनी पूर्ण केले आहेत व यंदा त्यांना **रु. ११ लाख** अनुदान विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे पुढील संशोधनाकरता प्राप्त झाले आहे. अनेक सेवाभावी संस्थांमध्ये त्या कार्यरत आहेत. मुंबई विद्यापीठ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाअंतर्गत पी. एच. डी. पदवीकरता त्या मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत व आजवर ४ विद्यार्थ्यांना त्यांच्या मार्गदर्शनाखाली पी. एच. डी. पदवी प्राप्त झाली आहे. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा, परिसंवाद यांचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. **ठाणे गौरव व पर्यावरण मित्र पुरस्कार** या दोन पुरस्कारांच्या त्या मानकरी आहेत.

- प्रा. प्रकाश माळी, रसायनशास्त्र विभाग यांना प्रियदर्शनी फाउंडेशन तर्फे पंडित जवाहरलाल नेहरू कर्तृत्व सन्मान पुरस्कार व अखिल भारतीय कला साहित्य संस्कृती अकादमी यांच्यावतीने राजीव गांधी इंडिया गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.



**प्रा. प्रकाश माळी कला अविष्कार सादर करताना**

- प्रा. अनिल आठवले यांना International Human Rights Justice federation यांच्या तर्फे **World Environment Social Award** प्राप्त झाला.

- प्रा. आकांक्षा शिंदे, गणित विभाग यांनी 2nd Intl conference of Mathematical Science and Application येथे १६ डिसेंबर २०१२ रोजी Finite Difference Scheme for Space Fractional Diffusion या विषयावर संशोधन निबंध सादर केला.

- डॉ. पूजा जगासिया, रसायनशास्त्र विभाग, यांचा Asian Journal of Research in Chemistry या नियतकालिकामध्ये Spectrophotometric Determination of Metavandates( VO3-) Using Tanic Acid as a Reagent या विषयावर लेख प्रकाशित झाला.

**विद्यार्थ्यांचे यश**

प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील कु. ऋतुजा निखरंजे या विद्यार्थीनीची Afternoon Dispatch & Courier या मॅगझिनकरता मॉडेल म्हणून निवड झाली.

**करियर मेळावा**

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी दि. २९ व ३० नोव्हेंबर २०१२ रोजी करियर मेळाव्याचे आयोजन केले होते.



**करियर मेळावा**

पदवी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आपले पदवी शिक्षण पूर्ण झाल्यावर पुढे काय करावे याबद्दल मार्गदर्शन

करण्याच्या उद्देशाने करियर मेळाव्याचे आयोजन दि. १ व ३ डिसेंबर २०१२ रोजी पतंजली सभागृहात करण्यात आले होते.

**राष्ट्रीय परिषदा**

**Recent Research Trends in Mathematics**

थोर गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या १२५ वी जयंतीचे औचित्य साधून २०१२ हे वर्ष राष्ट्रीय गणित वर्ष म्हणून घोषित करण्यात आले होते.

गणित विभागातर्फे ८ डिसेंबर २०१२ रोजी (Recent Research Trends in Mathematics) या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाचे उद्घाटन डॉ. सुधाकर आगरकर, होमी भाभा संशोधन केंद्र, मुंबई यांच्या हस्ते झाले.

या परिसंवादामध्ये विविध गणितीय मॉडेल्स, गणितावरील संशोधन, गणिताचा जीवशास्त्रीय विज्ञान यामधील वापर इ. विषयावर प्रकाश टाकण्यात आला.

यावेळी प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी यावर आपले विचार मांडले. गणित विभाग प्रमुख प्रा. मीनल वानखेडे यांनी केलेल्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**Phytochemistry : Recent Trends and Challenges**

Phytochemistry : Recent Trends and Challenges या विषयावर रसायनशास्त्र विभाग बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, TDM लॅबोरेटरी, सायन व इंटरनॅशनल सोसायटी ऑफ सायन्स ॲन्ड टेक्नोलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने १४-१५, डिसेंबर २०१२ रोजी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली होती.

मुलांना नवीन उत्पादनाच्या पद्धती माहिती करुन देणे तसेच Phytochemistry या विषयाबद्दल सर्व प्रकारचे ज्ञान मिळावे व क्षेत्रातील संशोधनाच्या संधी माहिती करुन देणे हा या परिषदेचा हेतू होता. या परिषदेच्या आधी ११ ऑगस्ट २०१२ रोजी दोन कार्यशाळा घेण्यात आल्या होत्या.

विविध राज्यांतून ३६५ प्रतिनिधींनी या परिषदेत सहभाग घेतला होता.

**Anuual Sports Day**

दि. २० डिसेंबर २०१२ रोजी वार्षिक खेळ दिवस साजरा केला गेला. यावेळी २४४ विद्यार्थ्यांनी व ३५ शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी यामध्ये सहभाग घेतला होता.

साऊ अलोक बिर्गॅन या पदवी महाविद्यालयातील प्रथम वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थ्याचा, प्रसाद कवटे बारावी इयत्तेतील विद्यार्थ्यास व तन्वी राणे ही तृतीय वर्ष विज्ञान शाखेतील विद्यार्थीनी जनरल चॅम्पियनचे मानकरी ठरले.

**माजी विद्यार्थी मेळावा**

विज्ञान महाविद्यालयाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा दि. २२ डिसेंबर २०१२ रोजी संपन्न झाला. १०० माजी विद्यार्थी यासाठी उपस्थित होते.

**कला मंडळचा वार्षिक कार्यक्रम**

दि. २० डिसेंबर २०१२ ते २४ डिसेंबर २०१२ या कालावधीत 'आकांक्षा' चे विविध कार्यक्रम झाले. या वर्षी ही संकल्पना बॉलीवुडची १०० वर्षे ही होती.



**'आकांक्षा २०१३' चे उद्घाटन करताना**

परमेश्वरी साचाच्या पायावर उभे असते ते धर्मयुक्त.

Mr. Ali Ahmed Momin (S.Y.B.Sc.) याची Mr. Bandodkar व Miss Priyanka Tambe (T.Y.B.Sc) हीची Miss Bandodkar अशी निवड झाली.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय, ठाणे

१) विधी फाऊंडेशन ठाणे व विप्रमंचे ठामनपा विधी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालय परिसरातील पतंजली सभागृहामध्ये दिनांक १ डिसेंबर २०१२ रोजी 'हेगडे व्याख्यानमाला' आयोजित करण्यात आली होती. सदर व्याख्यानमालेत अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश श्री. देशपांडे यांनी 'महिलांचे अधिकार' या विषयावर तर ॲड. प्रकाश भोसले यांनी 'मानवीय अधिकार', ॲड. संदेश पाटील यांनी 'दिवाणी दाव्याची उच्च न्यायालयातील वकीली' या विषयावर मत प्रदर्शित केले. यावेळी 'Best Young Law Practice Aspirant' हा पुरस्कार कु. नम्रता बोंबडे हीस देण्यात आला.

२) दिनांक १५-१२-२०१२ रोजी जोशी बेडेकर महाविद्यालय आयोजित 'जम्मू काश्मिर एक समस्या' या विषयावरील राष्ट्रीय चर्चा सत्रास विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या व सौ. श्रीविद्या जयाकुमार व प्राध्यापक श्री. मिथुन बनसोडे उपस्थित राहिले.

३) विधी महाविद्यालयात दिनांक १७ ते २१ डिसेंबर २०१२ दरम्यान तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक प्रशिक्षण आयोजित केले होते. यावेळेस त्यांना विविध मुद्द्यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

४) दिनांक २७ नोव्हेंबर ते १३ डिसेंबर या कालावधीत विधी महाविद्यालयात विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षा व्यवस्थित पार पडल्या.

५) मे २०१२ रोजी मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या तृतीय वर्ष विधी परिक्षेत विधी महाविद्यालयाची विद्यार्थिनी श्रीमती श्रीदेवी अय्यर ह्या मुंबई विद्यापीठातून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या.

६) सहसंचालक पनवेल यांचेकडून शिक्षकेतर पदे भरण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले. कार्यालय अधिक्षक-अनुसुचित जमाती, मुख्यलिपिक-अनुसुचित जमाती तसेच दोन ग्रंथालय परिचर एक अनुसुचित जाती व एक अनुसुचित जमाती.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

### प्रथम सत्राचा आढावा (६ ऑगस्ट २०१२ ते २४ डिसेंबर २०१२)

कोकणच्या ग्रामीण भागाचा शैक्षणिक विकास होण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाने महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय वेळणेश्वर येथे चालू शैक्षणिक वर्षात सुरू केले आहे. या महाविद्यालयाची सुरुवात ६ ऑगस्ट २०१२ रोजी झाली. हा उद्घाटन सोहळा या महाविद्यालयाच्या नाना फडणवीस सभागृहात संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या उद्घाटन प्रसंगी डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ, ठाणे यांनी या उपक्रमाची माहिती व या उपक्रमाचे उद्दिष्टे सांगितली. या उपक्रमास संस्थेचे पदाधिकारी, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक ९ ऑगस्ट २०१२ रोजी नाना फडणवीस सभागृहात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर व विद्यार्थी यांचे चर्चासत्र संपन्न झाले. तसेच विद्यार्थ्यांना ग्रंथालयाच्या वापराविषयी माहिती देण्यात आली. अभियांत्रिकी महाविद्यालयासाठी मुंबई विद्यापीठाने नव्याने सुरू करण्यात आलेल्या Credit & Grading Evaluation System ची माहिती प्रथम वर्ष विभाग प्रमुख श्री. अमित माने यांनी समजावून सांगितली.

दिनांक १५ ऑगस्ट २०१२ रोजी या महाविद्यालयाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिन साजरा झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी शिक्षक, विद्यार्थी, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

दिनांक २१ ऑगस्ट २०१२ रोजी डॉ. विजय बेडेकर, कार्याध्यक्ष विद्या प्रसारक मंडळ यांचे "Education in India Prior to British Rule" या विषयावर विद्यार्थी, कर्मचारी, पंचक्रोशीतील विविध क्षेत्रातील पदाधिकारी, वेळणेश्वरचे ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्यासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी प्रत्येक शनिवारी व्यक्तिमत्त्व विकास अंतर्गत विविध उपक्रम राबवले जातात. महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई यांनी "Know your Brain and Heat your Brain" या विषयावर व्याख्यान देऊन मार्गदर्शन केले. त्याच दिवशी दुसऱ्या सत्रात त्यांनी "Effective Communication" या विषयावर व्याख्यान देऊन संप्रेषणाचे महत्त्व, संप्रेषण करताना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती दिली. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून विविध दर्जेदार चित्रपट दाखविण्यात येतात. या चित्रपटांद्वारे मनोरंजन, शिक्षण, इंग्रजी भाषेबद्दलचे ज्ञान हे उद्देश साध्य केले जातात.

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती व सृजनशीलता वाढावी यासाठी १०-१० विद्यार्थ्यांचे Project Group तयार करण्यात आले आहेत. तसेच या ग्रुपमध्ये प्रत्येक शाखेच्या विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेतले आहे. प्रत्येक ग्रुपसाठी एक प्राध्यापक मार्गदर्शक म्हणून नेमण्यात आला आहे. या अंतर्गत दिनांक ७ सप्टेंबर २०१२ रोजी "Concurrent Engineering approach in project Building" या विषयावर महाविद्यालयाचे संचालक डॉ. कमलाकर देसाई यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रोजेक्ट दाखवून मार्गदर्शन केले.

दिनांक १५ सप्टेंबर २०१२ रोजी डॉ. विश्वेश्वरय्या यांच्या जयंती निमित्त महाविद्यालयात Engineer's Day साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी ग्रुप करुन आपापल्या विभागावर आधारित Power Point Presentation सादर केले. नंतर प्राचार्य डॉ. अविनाश चिंचोलकर व डॉ. देसाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदशन केले.

दिनांक १२ ऑक्टोबर २०१२ रोजी प्रा. श्री. गणेश दिवे यांच्या मार्गदर्शनाखाली ''प्रदूषण'' या विषयावर Poster Competition चे आयोजन करण्यात आले. या विषयावर सर्व विद्यार्थ्यांनी विविध Posters तयार केली व ''भोपाळ वायू गळती दुर्घटना'' या Poster ला प्रथम क्रमांक मिळाला.

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात २१२ व रत्नागिरी जिल्ह्यात ४११ प्राथमिक व माध्यमिक शाळा आहेत. या शाळांपैकी अंदाजे ९०% शाळांमध्ये मराठी माध्यमातून शिक्षण देण्यात येते. या शाळेतील जवळजवळ ९५% शिक्षकांना संगणकाचा वापर योग्य प्रकारे करता येत नसल्यामुळे ते अध्यापन व शालेय व्यवस्थापनात आमूलाग्र बदल घडवून आणू शकत नाही. कोकणातील शिक्षणाची ही परिस्थिती बदलण्यासाठी संगणक प्रशिक्षणाची नितांत आवश्यकता आहे. यासाठी सामाजिक बांधीलकी म्हणून विद्या प्रसारक मंडळ, ठाणे संचालित महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालयाने शालेय शिक्षकांसाठी मराठीतून ''संगणकाचा अध्यापन, व्यवस्थापन व सुसंवाद-संपर्कासाठी उपयोग'' ही कार्यशाळा दिनांक १३ व १४ सप्टेंबर २०१२ तसेच दिनांक १ व २ डिसेंबर २०१२ रोजी यशस्वीरित्या आयोजित केली. पहिल्या कार्यशाळेसाठी २२ तर दुसऱ्या कार्यशाळेसाठी ७० शिक्षक प्रशिक्षणार्थी सहभागी झाले.

अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाची पहिली Internal Assessment-१८ सप्टेंबर २०१२ ते २५ सप्टेंबर २०१२ या दरम्यान घेण्यात आली. दुसरी Internal Assessment ही २ नोव्हेंबर ते ७ नोव्हेंबर या

कालावधीत घेण्यात आली. दिनांक १९ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर विद्यार्थ्यांच्या तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा झाल्या. २५ व २६ नोव्हेंबर २०१२ रोजी BEE या विषयासाठी श्री. प्रमोद वायकर, व्याख्याने RMCET, देवरुख यांनी सराव शिबीर घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मुंबई विद्यापीठाची प्रथम सत्र परिक्षा दिनांक ४ डिसेंबर २०१२ ते २४ डिसेंबर २०१२ रोजी झाली.

दिनांक ६ ऑक्टोबर २०१२ रोजी पालक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा अहवाल पालकांना दाखवण्यात आला.

कनिष्ठ महाविद्यालय, पाटपन्हाळे व श्री देव गोपालकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय, गुहागर येथील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयास भेट देऊन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सेवा–सुविधा व विविध उपक्रमांची पाहणी केली.

प्रथम सत्रात या महाविद्यालयास अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या. त्यात डॉ. मधुकर आंबेकर आणि डॉ. विदुला आंबेकर, लंडन यु. के. यांनी महाविद्यालयातील सर्व विभागांचे चित्रीकरण करून त्यांनी महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. तसेच वसतिगृहास भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. श्री. गाडगीळ, श्री. एस. जी. ब्रम्हे आणि कुटुंब, श्री. व सौ. प्रियदर्शन दिक्षित, प्रा. आर. पी. खान, श्री. जोसेफ (अध्यक्ष श्री माउली मंडळ), श्री. मोरे (सचिव एस. एम. एम. ठाणे), श्री. रवी आंग्रे (विश्वस्त एस. एम. एम. ठाणे), श्री. भगवान शिंदे (विश्वस्त एस. एम. एम. ठाणे), श्री. काणे बंधू, श्री. सी. व्ही. काणे, श्री. प्रदीप शिर्के, श्री. श्रीराम काणे, श्री. संजय झेंबे इ. मान्यवरांनी महाविद्यालय परिसरास भेटी दिल्या. तसेच श्री. विजय महाजन, माजी अध्यक्ष, CITI बँक यु.एस.ए. यांनी विद्यार्थ्यांशी अर्थव्यवस्था या विषयावर व्याख्यान देऊन मार्गदर्शन केले.

●●●

## अभिनंदन



**प्रा. नारायण बारसे यांची मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती.**

मा. कुलगुरु मुंबई विद्यापीठ यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी–बेडेकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र आभ्यासक्रम संयोजक प्रा. नारायण बारसे यांची मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. सदर नियुक्तीचा कालावधी ८ ऑक्टोबर २०१५ पर्यंत असेल.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार या नियुक्तीबरोबरच प्रा. नारायण बारसे हे विद्यापीठाच्या खालील महत्वाच्या मंडळाचे देखील सदस्य झाले आहेत.

- विद्युत् सभा
- कला शाखा
- बोर्ड ऑफ युनिव्हर्सिटी टीचींग ॲन्ड रिसर्च फॉर फॅकल्टी ऑफ आर्टस
- रिसर्च ॲन्ड रिकग्नेशन कमिटी फॉर द लायब्ररी ॲन्ड इंन्फॉर्मेशन सायन्स.

प्रा. श्री. नारायण बारसे यांचे अभिनंदन !

# जाहीर आवाहन

**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे :**

विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली सुमारे ७५ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. आधुनिक पद्धतीचे व जागतिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचा मंडळाचा मानस आहे.

**कोकण परिसराची निवड :**

एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजूला सह्याद्रीच्या रांगा यांच्या मधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादन क्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत असते. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत असतो.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांची एकूण लोकसंख्या जवळ जवळ ३० लाख आहे. तरी सुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे, उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर याविषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागामध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण केली पाहिजे असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्याठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी आहे.

उच्चशिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागांत आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चिक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरातील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मुलभूत सोयी सुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईल; पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकास घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

**विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पविषयी:**

**कोकणातील गुहागर जवळ असलेला वेळणेश्वर हा ग्रामीण भाग मंडळाने नियोजित शैक्षणिक प्रकल्पासाठी निवडला आहे.** त्या गावची लोकसंख्या जवळपास ३५०० आहे व अशा गावात सुमारे ६५ एकर वरकस जमीन मंडळाने खरेदी केली आहे. तेथे एक शंकराचे सुरेख मंदिर आहे. त्याला वेळणेश्वर असे नाव आहे. शिवाय अरबी समुद्राची किनारपट्टी ही या गावाला लागून आहे. सरकारच्या नियोजित आराखड्याप्रमाणे लवकरच तयार होणार सागरी किनारपट्टी महामार्गही वेळणेश्वर गावाच्या बाजूने जाणार आहे.

या वास्तू समूहामध्ये ६ शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारती, प्राचार्य व प्रबंधकासाठी बंगले, विषय प्रमुख व प्राध्यापक व प्रमुख कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्र वास्तू

आणि विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे व इतर संबंधित वास्तू असे सर्व मिळून दहा लाख चौरस फुटांचे बांधकाम असलेला प्रकल्पाचा पूर्ण **खर्च १५० कोटी रुपये पर्यंत अपेक्षित आहे**. त्यामध्ये ३००० विद्यार्थी निरनिराळ्या विभागांतून शिक्षण घेतील. शिक्षकी पेशातील, कार्यालयीन कर्मचारी, शास्त्रीय व इतर विषयांचे तंत्र आणि सादिलवार कामे करणारे असे सर्व मिळून १००० व्यक्ती असतील. शिवाय वरील अनुषंगाने इतर कामे करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष इतरही व्यक्तींची वर्दळ वाढेल. याशिवाय, प्रकल्प सुरू झाल्यानंतर प्रकल्पा बाहेरच्या व्यक्तींनासुद्धा वाव मिळेल.

प्रकल्पाचा कल्पकतापूर्ण आराखडा जो ३००० विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी तयार केला आहे. त्याला चिपळूणच्या सहाय्यक जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुरी दिली असून, त्याचा पहिला टप्पा २०१२ पर्यंत पूर्ण होणार आहे. सुरुवातीला ३०० विद्यार्थ्यांना प्रवेश अपेक्षित असून अभियांत्रिकीचा एकूण ४ वर्षाचा पदवी अभ्यासक्रम असेल. २०१२-१३ शैक्षणिक वर्षापासून अभियांत्रिकी महाविद्यालय चालू करण्यात येणार आहे. त्यानंतर नव्याने अभियांत्रिकी, व्यवस्थापन, वास्तुशास्त्र आणि हॉटेल व्यवस्थापन याप्रमाणे नवीन अभ्यासक्रम सुरू होतील.

**देणगीसाठी व मुदत ठेवीसाठी आवाहनः**

मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदारमताच्या व्यक्ती, यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महाविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणारी स्वरूपात मदत घेऊन करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्यासाठी रु. १० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वीकारण्यास धर्मादाय आयुक्त, मुंबई यांनी मान्यता दिली आहे.

१) संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीतकमी रु. ५०००/- त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२) सदर ठेवीचा कालावधी ५/७ व १० वर्षाचा असेल. किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३) ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४) ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसास पंधरा दिवसात ठेव परत करण्यात येईल.

५) सदर ठेवीवर दरसाल दर शेकडा ५ टक्के सरळ व्याज दराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल.

६) काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडावयाची असल्यास, ठेवीदाराने ३ महिन्याची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल व ती मुदत ठेव ठेवल्यापासून सहा महिन्याच्या आत मोडल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

या प्रकल्पावरती पुढील १० वर्षात सुमारे १५० कोटी रुपये खर्च होईल. हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे हे त्यावेळेसच शक्य होईल, जेव्हा सर्व स्तरांतील दानशूर व्यक्ती व संस्थांचा हातभार लागेल. **या आवाहनातर्फे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा शैक्षणिक कार्यास सढळ हस्ते देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.**

आपला विश्वासू,

**डॉ. विजय बेडेकर**

कार्याध्यक्ष

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

●●●



# स्वप्न साकारत आहे...

हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,
हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे
हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे
नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे
ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,
सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !
हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,
ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे
हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,
न एके यामिनी
दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !
हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले
ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !
हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,
मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां
स्वप्न दिसे साकारले
आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा –
ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण
द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान
ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,
दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.
भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,
शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती
मनी जे सुजाण,

दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,
ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,
बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,
उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.
युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी
स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई
आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती
विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,
कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,
इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान
भूदल–सागर–सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती
शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती
नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे
सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.
बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,
विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां
नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार
स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार
नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,
बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा

– डॉ. वा. ना. बेडेकर

(Cover No. 3)

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❉ संपर्क ❉

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.